www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार




मुख्य संपादक - भारती संतोष आमले उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 325 शनिवार दि. ०९ ऑगस्ट २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 6 RNI MAHMAR/2023/89514

## श्रीवर्धन मध्ये आज नारळी पौर्णिमाच्या सणा निमित्त नारळ फोडी स्पर्धेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**



आज नारळी पौर्णिमेच्या सणानिमित्त श्रीवर्धन दांडा येथे दांडा मित्रमंडळाने नारळ फोडी स्पर्धेचे आयोजन केले होते, २००७ वर्षापासून हे मंडळ आपल्या पारंपरिक नारळ फोडी स्पर्धेचे शिस्तबद्ध नियोजन करत आहे, यावर्षी श्रीवर्धन तालुक्यातील १६ स्पर्धकांनी या स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला होता, या स्पर्धेत दिवेआगर या गावातील स्पर्धक सर्व पारितोषिकांचे मानकरी ठरले आहेत, प्रथम क्रमांक ७७७७/ आणि चषक श्री. प्रणव गुरव , द्वितीय क्रमांक व चषक ५५५५/ श्री. धीरज मांजरेकर, शिस्तबद्ध स्पर्धक आणि तृतीय क्रमांक व चषक ५००/ श्री. मानस जाधव, उत्कृष्ट फटकेबाज चषक श्री. प्रणव गुरव यांनी या स्पर्धेमध्ये पारितोषिके पटकावली आहेत, यास्पर्धेसाठी अनेक स्थानिक नागरिक आणि मित्रमंडळी यांचे सहकार्य लाभल्यामुळे स्पर्धा अत्यंत उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणामध्ये पार पडली.

# भारतावर लादलेल्या टॅरिफचा अमेरिकेलाच फटका

## ट्रम्प यांच्या माजी सहकाऱ्याचं विधान चर्चेत

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाकडून तेल आयात करत असल्याचे कारण देत भारतीय मालावर ५० टक्के आयात शुल्क लादले आहे. या निर्णयानंतर अमेरिकेचे माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जॉन बोल्टन यांनी ट्रम्प यांचा भारतावर शुक्ल लादण्याचा निर्णयाचे परिणाम अमेरिकेसाठी अत्यंत वाईट ठरल्याचे म्हटले आहे, यामुळे नवी दिल्लीला दूर ढकलण्यात आले आणि रशिया आणि चीनपासून भारताला दूर कारण्याच्या अमेरिकेच्या दशकांच्या प्रयत्नांचे नुकसान झाल्याचे म्हटले आहे. बोल्टन म्हणाले की, त्यांच्या निर्णयाचा उलटा परिणाम झाला, भारताबरोबरचे संबंध ताणले आणि चीनला मोकळीक देण्यात आली आणि यामुळे अमेरिकेचे महत्त्वाचे ध्येय कमकुवत झाले. नवी दिल्लीवर रशियन तेल खेरीदी केल्याच्या मुद्द्यावर लावण्यात आलेल्या प्रचंड शुल्काकडेही बोल्टन यांनी बोट दाखवले आणि याचवेळी ट्रम्प हे भारतापेक्षा चीनला पसंती देत असल्याचा आरोपही केला, तसेच ही एक प्रचंड मोठी चूक ठरू शकते असेही ते यावेळी म्हणाले. ट्रम्प यांनी एप्रिल महिन्यात माफक प्रमाणात चीनबरोबर टॅरिफवरून संघर्ष झाला पण त्यांच्यात करार केला जाणार असल्याने तो वाढणार



नाही याची काळजी घेण्यात आली. तर दुसरीकडे रशियाला युक्रेनविरोधातील लढाईत आर्थिक निधी पुरवत असल्याचा दावा करत भारतावर ५० टक्के शुल्क लादण्यात आले आहे. सीएनएनशी बोलताना बोल्टन म्हणाले की, हे गमतीशीर आहे की रशियाला नुकसान पोहचवण्यासाठी असलेले सेंकंडरी टॅरिफ हे भारताला रशिया आणि चीन यांच्या जवळ घेऊन जाऊ शकते आणि कदाचित हे तिन्ही देशांना एकत्र अमेरिकेबरोबर वाटाघाटी करण्यास परावृत्त करू शकते.

"ट्रम्प यांची चीनवर दाखवलेली उदारता आणि भारतावर मोठ्या प्रमाणात शुल्क लादणे यामुळे रशिया आणि चीन यांच्यापासून भारताला दूर आणण्याचे अमेरिकेचे दशकांपासूनचे प्रयत्न धोक्यात आले आहेत," असे बोल्टन म्हणाले.

'द हिल'मध्ये लिहिलेल्या एका लेखात बोल्टन म्हणाले की, ट्रम्प यांची बिजिंगबाबत सौम्य भूमिका ही चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याबरोबर करार करण्याच्या उत्साहात अमेरिकेच्या धोरणात्मक हितसंबंधांचा बळी देण्यासारखे आहे. "नवी दिल्लीवर लादण्यात आलेल्या शुल्काच्या तुलनेत व्हाईट हाऊस बिजिंगच्या बाबतीत टॅरिफ दर आणि इतर बाबतीत अधिक सौम्य भूमिका घेण्याच्या वाटेवर असल्याचे दिसून येते. जर असे असेल तर कदाचित ही एक प्रचंड मोठी चूक असू शकते," असे त्यांनी लिहिले आहे. ट्रम्प यांनी लादलेल्या अतिरिक्त टॅरिफमुळे भारताने रशियाकडून तेल खेरीदी करणे बंद तर केले नाहीच, उलट भारताने ट्रम्प यांनी लादलेले टॅरिफ हे अन्याय्य आणि अवास्तव असल्याचे म्हटले आहे. यादरम्यान रशियाने भारताला पाठिंबा दिला आहे आणि अमेरिकेवर बेकायदेशीर व्यापार दबाव टाकल्याचा आरोप केला आहे.

## "शिवसेना पुरस्कृत जय भवानी गणेश मंडळाची कार्यकारिणी जाहीर!

**दैनिक युवक आधार**
**नामदेव मडपे**

शिवसेना जिल्हाप्रमुख मा. ए. जे.पाटील बोराडे, व तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे पाटील,यांच्या मार्गदर्शनाखाली आज बाजार समिती कार्यालयात बैठक पार पडली.

अध्यक्षपदी पांडुरंग बोराडे, उपाध्यक्षपदी दीपक गायकवाड़, शेख अहमद भाई,विकास घनवट,फिरोजभाई पठाण,विजय चव्हाण,नानासाहेब बोराडे,तर कोषाध्यक्ष,अनिल बोराडे,अजय खंदारे,सचिवपदी,लिंबाजी बोराडे,अक्षयदिप वाघमारे,सह सचीवपदी,बंडु नाना बोराडे,पप्पु बोराडे,खजीनदार,कृष्णा बोराडे,भगवान बोराडे, तर कार्याध्यक्षपदी सचिन गायकवाड,नितीन मोरे,पिराजी पवले,तर स्वागत अध्यक्षपदी योगेश गणगे,रामराव वरकड,यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. व यावेळी सल्लागार समीती मा सभापती प्रल्हादराव जी बोराडे,




माजी सभापती संतोषराव वरकड, माजी उपसभापती किसनराव मोरे, श्रीरंग अण्णा खरात, तुळशीराम कुहिरे, ऍड ज्ञानेश्वर जाधव, शेख पाशाभाई, पवन खरात, अमोल विरकर, भगवान गायकवाड, चांद भाई पठाण भीमराव वाघ, अतुल इंगळे, विलास बनसोडे, जयदेव चव्हाण, उमेश चव्हाण, मनोज वायाळ,हर्षद साखळकर, सुमित राजे निंबाळकर, अनिल चव्हाण, नंदू जाधव, योगेश खरात, बाबा गोंडगे, गोविंद बोराडे, विजय शिंदे, विलास राठोड, विनोद खरात, विष्णुपंत मोरे, पवन वाघमारे,अजय गायकवाड, दादाराव खंदारे, व शिवसेना व शिवमुद्रा प्रतिष्ठान पदाधिकारी उपस्थित होते"

## विघ्नहर्ता काव्योत्सव संमेलन लातूर जिल्ह्यात साजरा होणार...

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

काव्ययोग काव्य संस्था पुणे आयोजित गणेशोत्सवानिमित्त विघ्नहर्ता काव्योत्सव लातूर पहिले राज्यस्तरीय कविसंमेलन २०२५ आयोजित करण्यात आले आहे. ह्या कवी संमेलन अध्यक्ष ज्येष्ठ सुप्रसिद्ध कवी अड.विजय कुमार कस्तुरे, कार्यक्रम अध्यक्ष डॉ.एम.आर.पाटील रॉयल एज्युकेशन सोसायटी लातूर,प्रमाण पाहुणे दत्ता घारगे मुख्याध्यापक शारदा इंटरनॅशनल स्कूल लातूर, प्रमुख पाहुणे ज्येष्ठ कथाकार बबन महामुनी, आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या विघ्नहर्ता काव्योत्सव मध्ये १०० कवी सहभाग घेणार आहेत. मान्यवरांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन,पुरस्कार वितरण तसेच विविध राज्यातून आलेल्या कवींचे राज्यस्तरीय कवी संमेलन पार पडणार आहेत.या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन काव्ययोग काव्य संस्थेचे लातूर जिल्हा अध्यक्ष अजय कुमार वंगे , लातूर महिलाध्यक्षा श्रीमती अन्नपूर्णा गंगणे , लातूर जिल्हा संघटक डॉ.शंकर चामे, कवयित्री अस्मिता तिगोटे,काव्ययोग काव्य संस्थेचे सचिव तुषार पालखे,छाया कांबळे मॅडम,काव्ययोग काव्य संस्था अध्यक्ष योगेश हरणे, उपाध्यक्ष गौरव पुंडे,श्रीराम घडे,प्रमोद सूर्यवंशी आदी सदस्यांनी नियोजन केले आहे.




विघ्नहर्ता काव्योत्सव दिनांक २४ ऑगस्ट २५ रोजी सकाळी १० ते ६ या वेळेत COCSIT COLLAGE रेणुका नगर लातूर येथे पार पडणार आहे.

## श्रीवर्धन मध्ये पारंपरिक पद्धतीने नारळी पौर्णिमा उत्सव साजरा

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**

नारळी पौर्णिमा हा कोकणातील मोठ्या सणा पैकी एक आहे, श्रीवर्धन मध्ये पारंपरिक पद्धतीने सर्व समाज बांधव हा सण साजरा करतात, अनेक जाती चे कोळी, खारवी, भंडारी, माळी, कुणबी अशा विविध जातीचे समाज बांधव नारळ वाहून आपलं रौद्ररूप शांत करण्यासाठी आणि आपलं रक्षण करण्यासाठी समुद्र देवतेला साकड घालतात आणि यानंतर कोळी बांधव आपल्या मासेमारीला सुरुवात करतात, श्रीवर्धन तहसीदार कार्यालयाकडून देखील यादिवशी समुद्राला मनाचा नारळ अर्पण केला जातो.



## दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय मुंबई, सचिव पदावर श्री.तुकाराम मुंढे यांच्या निवडीने दिव्यांग बांधवामध्ये आनंदाचे वातावरण :- जिलानी शेख

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)-**

दिव्यांग कल्याण विभाग मंत्रालय, मुंबई सचिव पदावर श्री.तुकाराम मुंढे, (भाप्रसे) यांची निवड झाल्याने दिव्यांग बांधवात आनंदाचे वातवरण निर्माण झाले आहे. बऱ्याच दिवसापासुन दिव्यांग बांधवाचे रखडलेले प्रश्न कोणी सोडवत नव्हते त्या मुळे दिव्यांग बांधव फार आडचणीत आला होता. बोगस दिव्यांगानी शासनाला फसवुन बोगस नोकऱ्या मिळवल्या आहेत. तसेच बोगस दिव्यांग संस्थाचा देखील फार मोठे जाळ निर्माण झालेले असुन त्याला पण आळा बसणे



आवश्यक आहे. सर्वात जास्त बोगस दिव्यांग प्रमाणपत्र धारक बीड जिल्ह्यात आहेत व वनफोर योजनेचा लाभ घेत आहेत. तसेच बीड जिल्ह्यात बोगस शिक्षक बदली प्रकरण फार गाजले होते ते दाबले गेले ते पुन्हा ओपन करून त्यांच्या वर कार्यवाही करणे आवश्यक आहे. दिव्यांग महामंडळाचे कर्ज प्रकरणे प्रलंबित आहेत त्या मध्ये जाचक अटी केलेल्या आहेत सातबारा वर बोजा टाकुन घेणे, नोकरदार जामीनदार देणे, जीएसटी कोटेशन आशा प्रकारे जाचक अटी केल्या आहेत. या सर्व अटी कमी कराव्यात तसेच संजय गांधी निराधार योजने च्या मानधना मध्ये वाढ व्हावी, दिव्यांगना घरकुल मिळावे, दिव्यांगना अंत्योदय राशन कार्ड मिळावे, ई रिक्षा योजना सरसकट दिव्यांगना देण्यात यावी, ईलेक्ट्रीक स्कुटर मिळावेत व न्याय मिळावा अशी आशा कर्तव्य दक्ष अधिकारी तुकाराम मुंडे साहेब यांच्या कडे दिव्यांग बांधवांच्या आहेत असे प्रसिद्धी पत्रकात दिव्यांग संघर्ष समिती महाराष्ट्र चे अध्यक्ष जिलानी शेख, शेख आलम, अशोक दगडखैर, शेख शेरखाँ, शेख नदीम, संतोषकुमार राख, वैभव देशमुख, ईश्वर आमटे, दत्ता कदम, गणेश नांदे, बजरंग लांढगे, संतोष गुजाळ, सय्यद मतीन यांनी म्हटले आहे.

## महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्याच्या

### मागणीसाठी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी घेतली प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट

**मुकुंद कांबळे सहसंपादक**
**दैनिक युवक आधार**
**नवीदिल्ली / मुंबई दि.8 -** महाकारुणी तथागत भगवान गौतम बुद्धांना बुद्धगया येथील महाबोधी वृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली त्या परमपवित्र स्थळी महाबोधी महाविहार उभारण्यात आले आहे.जगभरातील बौद्धांचे सर्वोच्च श्रद्धास्थान बुद्धगया येथील महाबोधी महाविहार आहे.त्याची विश्वस्त व्यवस्था ही 1949 च्या बी टी ऍक्ट नुसार चालते त्यात 4 बौद्ध आणि 4 हिंदू ट्रस्टी असून कलेक्टर चेअरमन असतो. त्यात बदल करून सर्व ट्रस्टी आणि चेअरमन हे बौद्धच असले पाहिजेत असा कायदा करून



महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे अशी आग्रही मागणी आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची संसदेत भेट घेऊन केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासोबत ना.रामदास आठवले यांनी 10 मिनिटे चर्चा केली. यावेळी सिन्दुर ऑपरेशन द्वारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानी दहशतवादी अड्डे नष्ट करण्याची केलेली कामगिरी उत्कृष्ट असून त्याबद्दल सर्व देशवासी आपले आभार मानत असल्याचे सांगत ना. रामदास आठवले यांनी प्रधानमंत्र्यांचे सिन्दुर ऑपरेशन केल्याबद्दल अभिनंदन केले. रिपब्लिकन पक्ष राष्ट्रीय स्तरावर एन डी ए चा घटका पक्ष आहे तसाच महाराष्ट्रात महायुती चा घटक पक्ष आहे. महाराष्ट्रात सत्तेत रिपब्लिकन पक्षाला वाटा मिळत नसल्याची खंत मांडत रिपब्लिकन पक्षाला महाराष्ट्रात सत्तेत वाटा मिळाला पाहिजे अशी मागणी ना. रामदास आठवले यांनी केली. मुंबईत इंदुमिलस्थळी वेगाने उभारण्यात येणाऱ्या महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर अंतरराष्ट्रीय स्मारक कामाचे भूमिपूजन आपल्या हस्ते झाल्याची आठवण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना ना. रामदास आठवले यांनी करून दिली.

प्रसिद्धी प्रमुख हेमंत रणपिसे

## जासई विद्यालयात रक्षाबंधन कार्यक्रम संपन्न



**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**


रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनिअर कॉलेज, दहागाव विभाग जासई. ता.उरण जि. रायगड.या विद्यालयात नारळी पौर्णिमा –रक्षाबंधनाचा सन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे वृक्षांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विद्यालयाच्या प्राचार्या सौ.म्हात्रे के.जी. यांनी विद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या वृक्षांना राखी बांधून कार्यक्रमाची सुरुवात केली,त्याचबरोबर उपमुख्याध्यापक कुठे सर , पर्यवेक्षिका मुकादम मॅडम यांनीही वृक्षांना राख्या बांधल्या. विद्यालयातील विद्यार्थीनिंनी वर्गातील विद्यार्थ्यांना राख्या बांधून बहिण भाऊ यांच्या पवित्र प्रेमाचा संदेश हा सण साजरा करून आचरणात आणला . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्तक मॅडम यांनी केले.

# चिपळूणच्या पाणथळीत 'ब्लॅक हेरॉन'चा विस्मयकारक अवतार!

## डॉ. जोशी यांच्या निरीक्षणातून समोर आली भारतातील पहिली नोंद

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार चिपळूण (प्रतिनिधी):** चिपळूणच्या पाणथळ परिसरात नुकताच एक अद्वितीय पक्षी दिसून आला आहे – तोही थेट आफ्रिकेहून! पक्षी निरीक्षक डॉ. श्रीधर जोशी यांच्या सजग नजरेतून दोन काळ्या बगळ्यांचा ब्लॅक हेरॉन (BLACK HERON – EGRETTA ARDESIACA) हा अत्यंत दुर्मिळ आणि भारतात आजवर न दिसलेला पक्षी प्रथमच आढळून आल्याची नोंद झाली आहे. ही घटना पक्षी अभ्यासकांच्या दृष्टीने ऐतिहासिक मानली जात आहे.

डॉ. जोशी हे दररोज सकाळी पक्षी निरीक्षणासाठी फिरायला जात असतात. रविवारी (दि. ३ ऑगस्ट) सकाळी फिरताना त्यांनी एका पाणथळ जागी दोन काळे बगळे अतिशय वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने मासे पकडताना पाहिले. त्यांनी त्वरित त्यांच्या कॅमेऱ्यात हे क्षण टिपले आणि घरी आल्यावर अधिक माहिती मिळवण्याच्या उद्देशाने सखोल अभ्यास केला. त्यावेळी त्यांना समजले की, जगात CANOPY FEEDING किंवा UMBRELLA FEEDING ही अनोखी मासे पकडण्याची शैली केवळ ब्लॅक हेरॉन या आफ्रिकन पक्षातच दिसून येते. पक्षी आपले पंख अर्धवर्तुळात पसरण्याची ही अनोखी युक्ती मास्यांना सावलीखाली आकर्षित करते आणि त्यांना सहज पकडता येते. सुरुवातीला हा रातबगळा (BLACK-CROWNED NIGHT HERON) असल्याचा अंदाज काही निरीक्षकांनी व्यक्त केला. मात्र लांब पाय, संपूर्ण काळे शरीर आणि 'कॅनोपी फिडींग'ची खास शैली या वैशिष्ट्यांवरून सर्वांचे एकमत झाले की, तो पक्षी म्हणजेच ब्लॅक हेरॉनच आहे.




ही माहिती व छायाचित्रे डॉ. जोशी यांनी 'इंडियन बर्ड जर्नल'कडे पाठवली असून भारतात या पक्ष्याची ही पहिलीच अधिकृत नोंद असल्याचे प्राथमिक संकेत आहेत.

**ब्लॅक हेरॉन कोण?**

BLACK HERON – EGRETTA ARDESIACA हा मुख्यतः पश्चिम आणि दक्षिण आफ्रिकेत आढळणारा निवासी पक्षी आहे. सेनेगल, सुडान, केनिया, तंजानिया, मोजांबिक आणि मॅडगास्कर हे त्याचे नैसर्गिक अधिवास आहेत. युरोपातही काही अपवादात्मक नोंदी (ग्रीस, इटली, डब्लिन) आहेत. मात्र भारतात आजवर या पक्ष्याचा एकही ठोस पुरावा मिळालेला नव्हता.

हा पक्षी स्थलांतर करत नाही. केवळ अन्नपाण्याची कमतरता असल्यास तो परिसर बदलतो. त्यामुळे त्याच्या चिपळूणमध्ये अचानक झालेल्या आगमनाने आश्चर्य व्यक्त होत आहे.

**काय आहे 'कॅनोपी फिडींग'?**

ही एक विशिष्ट मासे पकडण्याची शैली असून पक्षी आपल्या पंखांचा अर्धगोलाकार छत्रीसारखा आकार तयार करतो. त्या सावलीत मासे आकर्षित होतात आणि मग पक्षी त्यांना सहज झडप घालतो. ही शैली प्रामुख्याने ब्लॅक हेरॉनमध्येच दिसते.

"हे पक्षी इथे कसे आले, हे अद्याप अनाकलनीयच!"

"आफ्रिकेतील हे पक्षी चिपळूणमध्ये कसे आले, याचे उत्तर सध्या तरी गूढच आहे. गेल्या आठवड्यापासून मी ते पुन्हा पाहण्यासाठी विविध पाणथळ ठिकाणी शोध घेत आहे."

---

# राजीव आनंद यांची इंडसइंड बँकेच्या एमडी आणि सीईओपदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**



इंडसइंड बँक लिमिटेडच्या संचालक मंडळाने राजीव आनंद यांची बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती जाहीर केली. ते २५ ऑगस्ट २०२५ पासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी हा कार्यभार सांभाळतील. राजीव आनंद यांना बँकिंग आणि वित्त क्षेत्रातील ३५ वर्षांहून अधिक अनुभव असून त्यांनी या क्षेत्रातील अनेक महत्त्वाच्या भूमिका पार पाडल्या आहेत. त्यांनी अलीकडेपर्यंत ॲक्सिस बँकेत डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून काम पाहिले. त्यांचा कॅपिटल मार्केट्स, ट्रेझरी आणि ॲसेट मॅनेजमेंटमध्ये विशेष अनुभव आहे आणि त्यांनी खाजगी तसेच कॉर्पोरेट बिझनेसच्या वाढीत मोलाची भूमिका बजावली आहे. या नियुक्तीद्वारे, बँकेने योग्य कौशल्ये आणि दृढ मूल्ये असलेले एमडी आणि सीईओ तत्काळ ओळखण्याच्या आपल्या वचनबद्धतेवर शिक्कामोर्तब केले आहे. या नियुक्तीबाबत भाष्य करताना इंडसइंड बँकेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष सुनील मेहता म्हणाले कि, "संचालक मंडळाच्या वतीने, राजीव आनंद यांचे बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून स्वागत करत मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो. संचालक मंडळ राजीव आणि व्यवस्थापन टीमसोबत जवळून काम करण्यास उत्सुक आहे, जेणेकरून बँकेच्या वाढीला बळ मिळेल आणि उत्तम प्रशासन मानकांना प्राधान्य दिले जाईल. या संपूर्ण प्रक्रियेत अमूल्य पाठिंबा दिल्याबद्दल भारतीय रिझर्व्ह बँकेचे मनःपूर्वक आभार मानतो. संचालक मंडळ, व्यवस्थापन आणि सर्व कर्मचारी राजीव यांचे इंडसइंड कुटुंबात स्वागत करण्यासाठी आणि या संस्थेला तिच्या पूर्ण क्षमतेपर्यंत नेण्यासाठी सज्ज आहेत."

---

# अपर तहसील कार्यालयावर शेतकरी कामगार पक्षातर्फे मोर्चा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**
: कासारभट येथील शेतकऱ्याला न्याय मिळत नसल्याने शेतकरी कामगार पक्षाने आठ ऑगस्ट रोजी अपर तहसील कार्यालयावर माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली मोर्चाचे आयोजन केले होते. यावेळी तत्कालीन तलाठी आणि तत्कालीन मंडळ अधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा आणि शेतकऱ्याचा सातबारा जिवंत करण्यात यावा अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि शेकापचे रायगड जिल्हा शेतकरी सभेचे जिल्हाध्यक्ष अनिल ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली कासारभट येथील भोंडकर परिवारातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. साई येथील 108 गुंठे जमीन तत्कालीन तलाठी व तत्कालीन मंडळ अधिकारी यांनी बनावट कागदपत्रे बनवून व बनावट सावकार उभे करून जमीन हडप केल्याचा या दोघांवर आरोप आहे. भोंडकर या शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या तत्कालीन




तलाठी व मंडळाधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा तसेच सातबारावर पुन्हा भोंडकर कुटुंबीयांची नावे लागण्यात यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी अपर तहसीलदार यांनी याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवण्यात आला असल्याचे सांगितले. या वेळी सभापती नारायण घरत, पालिका जिल्हा चिटणीस प्रकाश म्हात्रे, तालुका चिटणीस पनवेल विधानसभा व माजी जिल्हा परिषद सदस्य विलास फडके, तालुका चिटणीस राजेश केणी, काँग्रेस पालिका जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, महापालिका महिला जिल्हाध्यक्ष हर्षला तांबोळी, शेकाप सहचिटणीस तेजस्विनी घरत, पुरोगामी जिल्हाध्यक्ष देवेंद्र पाटील आणि अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी, शेतकरी उपस्थित होते.

---

# पत्रकारांवरील हल्ल्याचा व्हॉईस ऑफ मीडिया कडून निषेध...

## तहसीलदारांना दिले निवेदन

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**
रिसोड.ता.8 सद्या राज्यामध्ये पत्रकारांवर हल्ले होण्याचे प्रमाण वाढले असून अशीच महाराष्ट्राला काळिमा फासणारी घटना मागील आठवड्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा येथील पत्रकार शंकर नाबदे यांच्यावर व त्यांच्यासोबत असलेल्या इतर दोन पत्रकार बांधवांवर तसेच अकोला जिल्ह्यातील पत्रकार सज्जाद हुसेन व त्यांच्या कुटुंबीयांवरही भ्याड व अमानुष हल्ला करण्यात आला.त्याचा निषेध म्हणून ता.7 रोजी तहसीलदार रिसोड यांचे मार्फत शासनाला निवेदन देण्यात आले.

पत्रकारांना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाते.पत्रकार आपल्या जीवाची पर्वा न करता जन सामान्यांसाठी अहोरात्र झटत असतात. आणि सातत्याने समाजातील उपेक्षित घटकाना न्याय देण्याचे काम पत्रकार करत असतात परंतु समाजातील गुंड प्रवृत्तीचे,समाज कंटकांकडून पत्रकारांवर हल्ले होत आहेत.खर तर हे शासकीय व्यवस्थेचे अपयश आहे. पत्रकारांवरील हल्ल्याचा निषेध म्हणून व्हॉईस ऑफ मीडिया रिसोड तालुका चे वतीने



तहसीलदार यांचे मार्फत शासनास निवेदन देण्यात आले. दोन्ही घटनेतील आरोपींना तात्काळ अटक करावी. पत्रकारांना संरक्षण कायद्याची अंमलबजावणी करण्यात यावी. महाराष्ट्रातील पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी विशेष पथक व हेल्पलाइन स्थापन करावी. यासह अनेक मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. पत्रकारांच्या मागण्या मान्य न झाल्यास राज्यभर व्हॉईस ऑफ मीडिया तीव्र आंदोलन छेडणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.यावेळी राज्यसंघटक संतोष चराटे तसेच जिल्हा कार्यकारणी सदस्य अर्जुन पाटील खरात,व्हॉईस ऑफ मीडिया रिसोड तालुका अध्यक्ष विनोद बोडखे,सचिव रुपेश बाजड,उपाध्यक्ष महादेव घुगे,संघटक नाजिम खान,सुरेश गिरी यांची उपस्थिती होती.

---

# महामार्गाच्या दिशा फलक खांबाला दुचाकी धडकली,दुचाकी चालकाचा जागीच मृत्यू

## सावंगी (पेरका) वळणावरील घटना

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-जितेंद्र खोडे**
राळेगावः-महामार्गावरील दिशा फलक खांबाला दुचाकी धडकून या अपघातात दुचाकी चालकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना राळेगाव तालुक्यातील सावंगी गावाजवळ दिनांक ७ ऑगस्ट रोजी २ वाजताच्या दरम्यान घडली. सुरेश रामाजी सुडीत वय ५५ वर्ष रा.गोकुळ नगर वनी असे अपघातात ठार झालेल्या दुचाकी चालकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार एम एच २९ सी एफ ०४८२ या क्रमांकाच्या दुचाकीने सुरेश हे राळेगाव



वरून वडकी मार्गे वणीकडे निघाले होते दरम्यान राळेगाव वडकी मार्गावरील सावंगी टर्निंग जवळ रस्त्यालगत असलेल्या दिशा फलक खांबाला त्यांची दुचाकी धडकली यात सुरेश हे गंभीर जखमी होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला.अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी ठाणेदार शितल मालटे,बिट जमादार रत्नपाल मोहाडे मेजर रामगडे यांनी घटनास्थळाला भेट दिली व घटनास्थळाचा पंचनामा करून मृतकाला ग्रामीण रुग्णालय राळेगाव येथे हलविण्यात आले असून घटनेचा पुढील तपास राळेगाव पोलीस स्टेशन करीत आहे.

---

# मानव जीवन सेवा ट्रस्ट यांच्याकडून गवाळी बांगरपाडा येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व महिलांना साडी वाटप.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी.गौरव खरे.मुरबाड.**
मानव जीवन सेवा ट्रस्ट घाटकोपर यांच्याकडून 7ऑगस्ट गुरुवार रोजी मुरबाड तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या गवाळी बांगरपाडा या शाळेमध्ये व अंगणवाडीमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांना वही,पेन,व पेन्सिल,व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. तसेच गावातील महिलांना साडी वाटप करण्यात आले.सामाजिक कार्यकर्ते तथा ग्रामपंचायत सदस्य श्री कांचन नाना भोईर यांच्या सहकार्याने सदर कार्यक्रम दरवर्षी गावामध्ये समाजाप्रती असलेली सामाजिक बांधिलकी जपत स्तुत्य उपक्रम ट्रस्ट च्या वतीने राबविला जातो.सदर उपक्रमाचे हे पाचवे वर्ष आहे.सदर कार्यक्रमाला मानव




जीवन सेवा ट्रस्ट चे अध्यक्ष श्रीमती.मीना देवजी जाधव,देवजी बी जाधव उपाध्यक्ष व त्यांची सर्व सहकारी टीम, शाळेचे शिक्षकवृंद ग्रामपंचायत गवाळी सरपंच बाळु शंकर एगडे,सामाजिक कार्यकर्ते तथा सदस्य श्री कांचन नाना भोईर,महिलावर्ग,गावकरी मोठया संख्येने उपस्थित होते.गेली पाच वर्ष नियमितपणे ट्रस्ट च्या माध्यमातून होणाऱ्या समाज उपयोगी उपक्रमाचे गवाळी ग्रामस्थानकडून, शिक्षकांकडुन समाधान व्यक्त होत आहे.

---

# मॉरिशसमध्ये रस्ता अपघातात गंभीर दुखापत होऊन पाय कापावा लागण्याची शक्यता असलेल्या 19 वर्षीय तरुणावर नवी मुंबईत यशस्वी शस्त्रक्रिया

## डॉ. प्रदीप महाजन यांच्या सेल बेस थेरपीने यशस्वी उपचार - कोणत्याही आधाराशिवाय स्वतःच्या पायावर उभा राहत रुग्ण मायदेशी परतला

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई**
: मॉरिशसमधील येथील १९ वर्षीय अशफाक नावाच्या मुलाला रस्ता अपघातात पायाला गंभीर दुखापत झाली होती. या गंभीर दुखापतीमुळे तेथील स्थानिक डॉक्टरांनी रुग्णाला गुडघ्याखालील भाग कापावा लागेल असे सांगितले. अखेर त्याने भारतात पुढील व उपचाराकरिता धाव घेतली व नवी मुंबईतील स्टेमआरएक्स हॉस्पिटलमध्ये रिजनरेटिव्ह थेरपीने त्याला अवयव न कापता पुन्हा पुर्ववत आयुष्य जगण्याची संधी दिली. स्टेमआरएक्स हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे रिजनरेटिव्ह मेडिसिन एक्स्पर्ट तसेच संस्थापक डॉ. प्रदीप महाजन यांनी या रुग्णाला नवे आयुष्य मिळवून दिले. अशफाक मोटारसायकलवर प्रवास करत होता तेव्हा एका चारचाकी त्यांना धडक दिली. मार्च २०२५ मध्ये झालेल्या या अपघातात त्याचा उजवा पाय दोन वाहनांमध्ये अडकून गंभीरपणे चिरडला गेला. हेल्मेट घालून आणि सुरक्षेच्या बाबतीत आवश्यक खबरदारी घेतल्यानंतरही, त्याला अनेक फ्रॅक्चर्स आणि ऊतींना दुखापत झाली होती. त्याला ताबडतोब मॉरिशसमधील जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, जिथे तातडीच्या जखमेची मलमपट्टी करुन,टाक्यांनी जखमेची जागा बंद केली गेली. त्यानंतर करण्यात आलेल्या सीटी स्कॅनमध्ये या दुखापतीचे गांभीर्य दिसून आले. तुटलेली हाडे, हाडांचे विस्थापन , सांधे निखळणे आणि ऊतींना दुखापत झाली. स्थानिक वैद्यकीय पथकाने रुग्णाला शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. परंतु यात ऊती मृत्य पावण्याची शक्यता अधिक असल्याचा इशारा दिला, ज्यामुळे शेवटी तो भाग कापावा लागू शकतो. त्यानंतर अशफाकने यावर अनेक पर्याय शोधण्याचा प्रयत्न केला आणि नवी मुंबईतील स्टेमआरक्स हॉस्पिटलकडे धाव घेतली. स्टेमआरएक्स येथील टिमने शस्त्रक्रिया न करता उपचार करण्याचे ठरवले . चार महिन्यांहून अधिक काळ, अशफाकने रिजनर्टिव्ह थेरेपीद्वारे उपचार, जखमांची योग्य काळजी, संसर्ग नियंत्रणासाठी अँटीबायोटिक्स, त्वचा आणि हाडांचे कलम करणे आणि हायपरबेरिक ऑक्सिजन थेरपी (HBOT) ची सत्रे घेतली. त्याच्या उपचारांचा एक प्रमुख भाग म्हणजे एमडीआय थेरपी, जी शरीराच्या नैसर्गिक इन्सुलिन रिलीज पॅटर्नची प्रमाणे कार्य करते. ही थेरपी ऊतींची जलद निर्मिती करणे, हाडांची सूज कमी करणे, हानिकारक



चरबी उत्पादनांना मर्यादित करते, रक्तप्रवाह सुधारते तसेच मज्जातंतू पुनर्प्राप्तीस देखील मदत करते. *स्टेमआरएक्स हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे रिजनरेटिव्ह मेडिसिन एक्स्पर्ट आणि संस्थापक डॉ. प्रदीप महाजन सांगतात की,* मार्च २०२५ मध्ये रुग्णाने त्याच्या वडिलांसोबत स्ट्रेचरवर विमान प्रवास केला, त्याचा पाय कापावा लागू नये व त्याला पुन्हा चालता यावे यासाठी त्यानी स्टेमआरएक्स हॉस्पिटलची वाट धरली. जेव्हा रुग्णाला पहिल्यांदा पाहिले तेव्हा त्याचा पाय खराब झाला होता, हाडे तुटली होती आणि ऊतींचे नुकसान झाले, ज्यामुळे त्याला चालणे अशक्य झाले. रिजनरेटिव्ह थेरपी आणि योग्य देखरेखीमुळे अशफाकच्या जखमा बऱ्या झाल्या, हाडे पुन्हा जुळू लागली आणि नवीन ऊती निर्माण होण्यास तयार झाल्या. पायाच्या दुखापतीवर वेळेवर उपचार न केल्यास ऊती आणि स्नायूंचे कायमस्वरूपी नुकसान, संसर्ग/ गँगरीन किंवा क्रश सिंड्रोम आणि पाय कापावा लागणे यासारख्या जीवघेण्या गुंतागुंती होऊ शकतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, पाय कापावा लागला नाही आणि त्या तरुणाने त्याच्या पायाचे कार्य पुन्हा पुर्ववत सुरू केले. *डॉ. प्रदीप महाजन पुढे सांगतात की,* अशफाकच्या केसमध्ये रिजनरेटिव्ह औषधाची प्रभावी परिणाम व त्यांची क्षमता दिसून येते, विशेषतः आघातग्रस्त रुग्णांसाठी हे फायदेशीर ठरते. एमडीआयसारख्या तंत्रज्ञानामुळे, गंभीर प्रकरणांमध्ये देखील यश प्राप्त करता येते. या यशामुळे अशफाकला त्याचा पाय आणि स्वातंत्र्य परत मिळाले. अशा प्रकारच्या दुखापतींनी ग्रस्त असलेल्या रुग्णांसाठी हे खरोखरच प्रेरणादायी ठरणार आहे. तो आता चालण्यास, पायऱ्या चढण्यास सक्षम आहे आणि त्याला दैनंदिन कामे करण्यात कोणतीही अडचण येत नाही. रुग्णाला सांध्यावर अतिरिक्त ताण टाळण्याचा, संरक्षक पादत्राणे घालण्याचा, निरोगी आहाराचे सेवन करण्याचा, फिजिओथेरपी सुरू ठेवण्याचा आणि चांगली स्वच्छता राखण्याचा सल्ला दिला जातो. रुग्णाने विमानाने मॉरिशसला स्वतःच्या पायावर उभे राहत सुखरुप प्रवास केला आणि चालताना त्याने आधारासाठी वॉकर देखील वापरला नाही. जेव्हा मॉरिशसमधील डॉक्टरांनी मला सांगितले की मी माझा पाय गमावू शकतो, तेव्हा मी खुप घाबरलो. मी एका पायाने दैनंदिन कामं कशी करणार याची चिंता वाटू लागली. पण नवी मुंबईतील स्टेमरएक्स हॉस्पीटलमध्ये आल्यापासून मला जगण्याची नवी दिशा मिळाली व डॉ. महाजन आणि त्यांच्या टीमने मला वेळोवेळी प्रोत्साहन दिले अशी प्रतिक्रिया रुग्ण अशफाकने व्यक्त केली.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# चिमुकल्यांनी पाठवल्या सीमेवरील जवानांना 400 राख्या

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

भारत देशाच्या रक्षणासाठी अहोरात्र कडा पहारा देणाऱ्या भारतीय सीमेवरील सर्व जिगरबाज जवानांना येणाऱ्या रक्षाबंधन सणानिमित्त तालुक्यातील पालखेड येथील महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कुल, पालखेड येथील इयत्ता ५वी ते १० वी च्या मुला-मुलींनी ४०० राख्या पाठवून जवानांबद्दलचे भाऊ-बहिणीचे अनोखे प्रेम जोपासले आहे, राख्या बनविण्यासाठी विद्यालयातील शिक्षकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.याप्रसंगी झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात मुख्याध्यापक अशोक शेळके, निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्दवळे, संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे, सागर जाधव, राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव, संजय कोकतरे, कविता ढोमसे,सारिका पवळे, राहुल दवते, सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी आदी उपस्थित होते. सदर उपक्रमात शाळेच्या मुला -मुलींनी सीमेवरील जवानांना पत्र पाठवून त्यात आम्हा सर्वांचे आयुष्यही या धाडसी,शूर व जिगरबाज जवानांना लाभो तसेच सैनिकांबद्दल अतिशय चांगल्या स्वरूपाचे गुणगान गायले असून अश्या स्वरूपाची मनोमन प्रार्थना देखील विद्यार्थांनी यावेळी देवाकडे केली आहे, याप्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक- शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.


भारतीय सीमेवरील जिगरबाज जवानांना राख्या पाठवताना विद्यार्थी समवेत उपस्थित मान्यवर आदी.

> सदर उपक्रमाद्वारे विद्यार्थी दशेतच सैनिकांप्रती असलेली कृतज्ञता,आपुलकी,आत्मीयता प्रकट होऊन राखीच्या एका धाग्याने विद्यार्थ्यांचे आपल्या शूर सैनिकांशी अतूट असे नाते जोडले जावे. तसेच सैनिकांमध्ये असलेले शौर्य व शिस्त याबद्दल आदरभाव व देशप्रेम निर्माण होऊन सुजाण नागरिक घडावेत अशी अपेक्षा आहे.
>
> **अशोक शेळके**
> **मुख्याध्यापक-न्यू इंग्लिश स्कुल, पालखेड**

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप आहेर यांनी तर आभार संजय लव्हांगडे यांनी मानले.

## नांदेड वाहतूक सर्वेक्षणासाठी CRRI चे शुल्क माफ करून होलीसिटी घोषित करा

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

गोदावरी नदीच्या काठावर वसलेले नांदेड हे गुरुद्वारा हजूर साहिबमुळे अमृतसरनंतरचे दुसरे प्रमुख शीख तीर्थक्षेत्र आहे. दिवसेंदिवस वाढणाऱ्या पर्यटकांच्या संख्येमुळे आणि वैद्यकीय व शैक्षणिक केंद्र म्हणून झालेल्या प्रगतीमुळे शहरातील वाहतूक समस्या गंभीर होत आहेत. या पार्श्वभूमीवर नांदेडसाठी केंद्रीय रस्ते संशोधन संस्था CRRI मार्फत वाहतूक सर्वेक्षण करण्याची विनंती केली आहे. CRRI ने यासाठी नांदेड महानगरपालिकेला सुमारे 1 कोटी रुपये शुल्क भरण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र महानगरपालिका प्रशासकीय कारणांमुळे हे शुल्क भरण्यास असमर्थ आहे. यामुळे पंतप्रधान कार्यालय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांची भेट घेऊन हे शुल्क माफ करण्याची मागणी केली तसेच नांदेडला "होली सिटी म्हणून घोषित करून देशातील आंतरराष्ट्रीय पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याची विनंती केली.



## राजेश हरी राठोड. शिरपुटी हरवले आहेत.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

शिरपुटी:-राजेश हरी राठोड वय 37.वर्ष.रंग सावळा उंची 5.फूट 5.इंच.अंगात काळ्या बाह्याचे फुल शर्ट व निळ्या रंगाची जीन्स पँट पायात काळ्या रंगाचा बूट.रा. शिरपुटी. ता वाशिम जि. वाशिम. हकीकत पोलीस स्टेशन अनसिंग येथे दिनांक.27.7.2025. रोजी फिर्यादी नामे हरी घनु राठोड .जबानी रिपोर्ट दिला की त्याचा मुलगा नामे राजेश हरी राठोड.वय 37.वर्ष हा मागील दोन वर्षांपासून मतिमंद असल्यासारखा वागत आहे.दिनांक 15.7.2025.रोजी. सकाळी वेळ अंदाजे 7./00वाजता. च्या सुमारास चहा पिऊन घराबाहेर गेला. तो सायंकाळपर्यंत परत आला नाही. त्याचा आम्ही गावांमध्ये नातेवाईकाकडे शोध घेतला तरी मिळून आला नाही. आजपर्यंत मुलगा घरी येण्याची वाट बघितली तो परत आला नाही. तो कुठे गेला या बाबत काही माहिती नाही.व कोणावर काही संशय नाही अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून मिसिंग क्र.15./.025. प्रमाणे दाखल करून तपासात घेतला तरी वरील वर्णनाचा इसम नवीन आल्यास पोलीस स्टेशन अनसिंग.येथे कळवावे.

> संपर्क.(अमर चौरे.पोलीस निरीक्षक. अनसिंग.9823310671.)
> (जगन्नाथ खंदारे.पो ह वा.8668564850.)
> प्रतमाहितीस सादर.1. जिल्हा माहिती अधिकारी वाशिम.2. आगार व्यवस्थापक बस स्थानक वाशिम.3. रेल्वे स्टेशन रेल्वे स्टेशन वाशिम.4. सर्व दैनिकांचे मुख्य संपादक व जिल्हा प्रतिनिधी वाशिम.

## रत्नागिरी जिल्हा अजिंक्य पद तायक्वांदो स्पर्धेत ओणीची सुकन्या परी संजय जडयार हिने पटकावले रौप्य पदक

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण :- (प्रमोद तरळ)**

येथे पार पडलेल्या २५ व्या जिल्हा अजिंक्य पद तायक्वांदो स्पर्धेत ओणीची सुकन्या आणि लांजा तालुका तायक्वांदो फिटनेस अकॅडमीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या कुमारी परी संजय जडयार हिने रौप्य पदक पटकावले आहे.


कु.परी ही महाराष्ट्र नवनिर्माण सेना राजापूर तालुका सचिव श्री.संजय विष्णू जडयार (गोरुळेवाडी) ओणी यांची ती कन्या आहे. तिच्या या यशात तिचे गुरू तेजस्विनी आचरेकर मॅडम (राष्ट्रीय पंच, प्रशिक्षक,), तेजस पावसकर सर, गौरव खेडेकर सर, शीतल आचरेकर मॅडम,आई पायल जडयार इत्यादीचे मार्गदर्शन लाभले. कु परी ही अत्यंत हुशार व गुणी खेळाडू असून तीने मिळवलेल्या या पदकामुळे तिच्यावर रत्नागिरी जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

## सुधाकर घारे फाउंडेशनच्या वतीने कर्जत-खालापूर

### मतदारसंघातील बहिणींनी सीमेवर तैनात असलेल्या वीर भावांसाठी प्रेमाने राख्या पाठवण्याचा संकल्प

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

सुधाकर घारे फाउंडेशनच्या वतीने ऑपरेशन सिंदूरच्या सन्मानार्थ, कर्जत-खालापूर मतदारसंघातील बहिणींनी सीमेवर तैनात असलेल्या आपल्या वीर भावांसाठी प्रेमाने राख्या पाठवण्याचा संकल्प केला आहे. या राख्यांमधून त्यांच्या शौर्याला सलाम आणि सुरक्षिततेसाठी मन:पूर्वक प्रार्थना गुंफलेली आहे. या राख्या लवकरच सीमेवर पाठवण्यात येणार आहेत. बहिणींच्या प्रेमाचं हे अभिमानास्पद प्रतीक असेल. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय सरचीटणीस तथा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सुधाकर घारे यांना सोपवल्या नंतर त्यांनी घारे यांच्या वर जो विश्वास दाखवला आहे. त्याचे गांभीर्य जपत जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष संघटनेच्या बळकटीकरणासाठी आणि पक्ष वाढीसाठी घारे यांनी जिल्ह्यात विविध उपक्रमांनी ,देश,समाज ,संस्कृती च्या माध्यमातून लोकांच्या माध्यमातून सकारात्मक संदेश पोहचविण्यासाठी आपल्या सहकार्याच्या माध्यमातून कार्य चालू केल्याने जिल्ह्यातील पक्षाची ताकद वाढत असल्याचे दिसत आहे. जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना सोबत घेऊन येणाऱ्या काळात एकजुटीने पक्ष वाढविण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यातील दौरा करत असल्याने गाव ते जिल्हा पातळीवर सर्व पदाधिकारी कटिबद्ध असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.याचा उपयोग आगामी सर्व निवडणूकित यश प्राप्त करण्यासाठी महत्वाचा असेल हे निश्चितच जनता जनार्दन ठरवेल .




## झाडे लावा झाडे जगवा,हरित महाराष्ट्र हरित बीड हरित गाव

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :- मारुती सत्रे**

दिनांक 07/08/2025 "झाडे लावा, झाडे जगवा"..."हरित महाराष्ट्र- हरित बीड-हरित गाव" तसेच !!एक पेड माँ के नाम!! अभियानांतर्गत वृक्ष लागवड/घनवन प्रकल्प ग्रामपंचायत आदर्श गाव सराटेवडगाव-आनंदवाडी ता.आष्टी जि.बीड

लोकसहभागातून जानपीर देवस्थान परिसरात गायरान क्षेत्रावर 1500 वृक्ष लागवड करण्यात आली. नेहमीच समाजकार्यात अग्रेसर असणारे गावातील युवक ग्रामस्थ यांची वृक्षारोपण करण्यासाठी साथ मिळाली याप्रसंगी सरपंच सौ.कोमलताई भिमराव बोडखे,कर्तव्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदीप भाऊ सुंबरे,जि.प.प्रा.शाळेचे सहशिक्षक श्री. अस्वर सर,श्री.थेटे सर,विद्यार्थी, ग्रा. पं.सदस्य राजमहंमद शेख,ग्रा.पं.सदस्य बापूराव सुंबरे,ग्रा.पं.सदस्य शिवदास नन्नवरे सर,ग्रा. पं.सदस्य राहुल गजघाट, ग्रामविकास अधिकारी श्री.बलभीम परकाळे, ग्रामरोजगार सेवक मोहन कापरे, मिराबाई कापरे,माजी ग्रा.पं.सदस्य बाळकृष्ण तरटे,माजी ग्रा.पं.सदस्य नबी शेख,पांडू शिंदे,अशोक सुंबरे,अजिनाथ बोडखे, धोंडीभाऊ झगडे,अशोक कळसाईत, नाना झगडे, भाऊ गायकवाड, ग्रा.पं. कर्मचारी अशीफ शेख,प्रवीण शिंदे आदी युवक ग्रामस्थांनी सहकार्य केले धनवंत



प्रकल्पास आष्टी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री.बागलाने साहेब,श्री.जायभाये साहेब वि.अ.(पं),शिंदे साहेब वि.अ.(पं),राऊत साहेब वि.अ.(कृषि),निंबाळकर साहेब वि.अ.(पं),रासकर साहेब यांनी घनवन प्रकल्पास भेट देऊन पाहणी केली.

# रिपाई पनवेल शहर अध्यक्ष पदी निलेश सोनावणे यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/प्रतिनिधी**

केंद्रीय समाजी न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदासजी आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगर पालिका क्षेत्र जिल्हा अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांच्या मान्यतेने गेली २५ वर्षे सामाजिक क्षेत्रात अग्रेसर काम करणारे सामाजिक कार्यकर्ते तथा जेष्ठ पत्रकार निलेश रामचंद्र सोनावणे यांची रिपाई पनवेल शहर अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. रिपाई महाराष्ट्र राज्य कार्यकारणी सदस्य सुमित मोरे यांच्या हस्ते पनवेल महानगर पालिका क्षेत्र जिल्हाअध्यक्ष प्रभाकर कांबळे यांनी निलेश सोनावणे यांना नियुक्ती पत्र दिले .



गेली २५ वर्षे सामाजिक क्षेत्रात काम करणारे निलेश सोनावणे हे जेष्ठ पत्रकार असून गेली २० वर्षे ते पनवेल युवा नावाचे स्वतःचे वर्तमान पत्र चालवतात ,सामाजिक क्षेत्रात उत्तम काम करीत असल्याने २० पेक्षा अधिक पुरस्कारांनी त्याना जिल्हा पातळीपासून देश पातळीवर गौरवले आहे . भारतीय बौद्ध महासभा सारख्या धार्मिक संघटनेने देखील त्यांना समाज रत्न पुरस्काराने गौरविले आहे ,सामाजिक धार्मिक कार्यात त्यांचे मोठे योगदान आहे ,डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन निर्मिती समिती मध्ये देखील त्यांनी विशेष काम केले होते , महाराष्ट्र शासनाचे त्यांनी विशेष कार्यकारी अधिकारी पद (SEO ) म्हणून देखील यांनी काम केले आहे . या नियुक्तीच्या वेळी खांदेश्वर शहर अध्यक्ष दिनेश जाधव ,रिपाई युवा अध्यक्ष अक्षय अहिरे , नवीन पनवेल अध्यक्ष अंकुश साळवे , रिपाई कार्यकर्ते अमोल इंगोले , उपस्तिथ होते .त्यांच्या या निवडीबद्दल रिपाई रायगड जिख अध्यक्ष नरेंद्र गायकवाड ,रिपाई जिल्हा प्रवक्ते तथा पनवेल महानगर पालिका जिल्हा क्षेत्र कार्याध्यक्ष मोहन गायकवाड,रिपाई तालुका अध्यक्ष विजय पवार ,सामाजिक , शैक्षणिक ,कला क्रीडा ,शासकीय , राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी निलेश सोनावणे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे .

# लेखी टाईम बॉण्ड दिल्यानंतर इर्शाद पटेल यांचे उपोषण मागे.

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी: महादेव उप्पे**

लेंडी धरणग्रस्तांच्या विशिष्ट मागण्या घेऊन चार ऑगस्ट पासून अडव्होकेट इर्शाद पटेल यांनी उप जिल्हाधिकारी कार्यालयास देगलूर समोर आमरण उपोषण सुरू केले होते.समस्त बारा गावच्या धरणग्रस्तांच्या व रावणगाव येथील नवतरुणांच्या खंबीर पाठिंब्याने तसेच विविध पक्ष व सामाजिक संघटनांनी दिलेला भक्कम पाठिंबा.तथा पत्रकार संघटनांच्या भक्कम पाठिंबामुळे सदरील उपोषण महाराष्ट्रभर गाजले.अगदी जिव्हाळ्याची प्रश्न घेऊन उपोषणास बसल्याने रात्री अपरात्री सुद्धा जिल्ह्यातून विविध भागातून समर्थन पत्रे देण्यात येत होती. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी उप जिल्हाधिकारी व पोलीस निरीक्षक देगलूर यांची उपोषणकर्त्यासोबत चर्चा झाली. मात्र प्रशासन देत असलेल्या पोकळ आश्वासनावर विश्वास नसल्याचे सांगितल्याने चर्चा विफल ठरली.परत तिसऱ्या दिवशीही उपजिल्हाधिकारी यांनी उपोषणकर्त्यास भेट दिली.

मात्र इर्शाद पटेल हे आपल्या मतावर ठाम राहिले. अखेर उपोषणाच्या चौथ्या दिवशी उपोषणकर्त्याची तब्येत खालावल्यानंतर प्रशासन नमते झाले. आणि पुनर्वसनातील कामे ३० ऑक्टोबर पर्यंत पूर्ण करण्याचे लेखी हमी दिले.यामध्ये दिलेल्या वेळेत काम पूर्ण झाले नाही तर संबंधितावर कार्यवाही होईल असे पत्रात नमूद केले आहे. तसेच काही प्रश्न वरिष्ठ शासन तसेच मंत्रालय स्तरावरच्या असल्याने येत्या आठवड्यात जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे विशेष बैठकीचे नियोजन केले आहे.

प्रमूख मागण्यातून वयाची एकवीस वर्षे पूर्ण झालेल्यांना वाढीव कुटुंब मावेजा कशा पद्धतीने देता येईल, तसेच ज्याची वारस ही मुलगी आहे त्यास मोबदला देणे आवश्यक आहे. अन्यथा घटनेचा १४ व १५ कलमांचे उल्लंघन होत असल्याचे कायद्यान्वये पटेल यांनी उप जिल्हाधिकारी यांना समजावून सांगितले.तसेच प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र परत घेऊन एकमुस्त रक्कम का देण्यात येऊ नये? व वाहतूक भत्ता पन्नास हजारापेक्षा अधिक कसा देता येतो हे इर्शाद पटेल यांनी महाराष्ट्र शासन निर्णयाचा पुरावा देत समजावले. जे की योग्य असल्याचे उप जिल्हाअधिकारी यांनी मान्य केले.व लगेचच यावर बैठक घेऊन तात्काळ निर्णय घेण्याचे ठरवले.

याशिवाय ज्यांनी आजपर्यंत प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र काढले नाही अशांसाठी १५ ऑगस्ट नंतर लगेचच उप जिल्हाधिकारी कार्यालय देगलूर येथे कॅम्प लावण्याचे ठरले. एकंदरीत रित्या दोन ते तीन मागण्या वगळता सर्वच मागण्या मान्य झाल्याने इरशाद पटेल यांनी उपोषणापासून माघार घेतली.याशिवाय रावणगाव येथील नवतरुणांसह विविध पक्ष सामाजिक संघटना मित्रपरिवार विशेष म्हणजे मीडियाने दिलेल्या पाठिंब्याने मी लढाई जिंकलो असल्याचे इर्शाद पटेल यांनी सांगितले.




## भारतीय जनता पार्टी जिल्हा व्यापारी आघाडी अध्यक्ष पदी राजु गुंदेचा तर राळेगांव भाजपा शहराध्यक्षपदी शुभम मुके यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

राळेगाव :-शहरातील प्रतिष्ठित व्यापारी व भाजप कार्यकर्ते श्री राजुभाऊ मोहनलाल गुंदेचा यांची भारतीय जनता पार्टी यवतमाळ जिल्हा व्यापारी आघाडी अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे तर येथील भाजपा शहराध्यक्षपदी शुभम मुके यांची नुकतीच निवड करण्यात आली असून त्यांच्या निवडीने शहरातील युवा कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेल्या शुभम मुके आणि राजु गुंदेचा यांची कार्यशैली व संघटन क्षमता लक्षात घेता त्यांच्यावर भाजपने ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.शुभम मुके आणि राजु गुंदेचा गेल्या काही वर्षापासून राळेगाव शहरात सामाजिक कार्यात अग्रेसर असून युवकांमध्ये संघटन नेतृत्व सकारात्मक विचारधारा निर्माण करण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबविले आहे.त्यांच्या या निवडीमुळे युवा वर्गात प्रचंड उत्साह निर्माण झाला आहे.भारतीय जनता पार्टीने आपल्यावर दिलेल्या जिम्मेदारी व विश्वासाबद्दल त्यांनी आदिवासी विकास मंत्री तथा आमदार अशोक उईके व भाजपा जिल्हाध्यक्ष अँड, प्रफुलसिंह चौहान यांचे आभार मानले आहे.



या निवडीबद्दल भाजप तालुकाध्यक्ष सौ छायाताई पिंपरे,जिल्हा उपाध्यक्ष चित्तरंजन कोल्हे,जिल्हा उपाध्यक्ष अनिल राजूरकर,अरविंद फुटाणे,डॉ कुणाल भोयर,बाळासाहेब दिघडे,संदीप पेंदोर प्रितेश वर्मा,आशिष इंगोले,शोभाताई इंगोले,उषाताई भोयर,बबन भोंगारे, अशोक चौधरी,निलेश घिनमीने, गणेश देशमुख व असंख्य भाजपा कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या.

# विंचूर उपबाजार आवारास 8 हेक्टर 61.56 आर जागा मंजूर

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर -** लासलगाव बाजार समितीच्या विंचूर उपबाजार आवाराकरिता सुभाषनगर ग्रामपंचायत हद्दीतील ८ हेक्टर ६१.५६ आर जागा राज्य शासनाकडून शासकीय दराने मंजूर झाली आहे, अशी माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर जगताप, उपसभापती संदीप दरेकर यांनी दिली. लासलगाव बाजार समितीने विंचूरसह परिसरातील शेतकरी बांधवांच्या सोयीसाठी स्वमालकीची २ हेक्टर ४० आर जागा खरेदी करून विंचूर येथे उपबाजार आवार सुरू केले आहे. सदर उपबाजार आवारात कांद्यासह भुसार व तेलबियांचे लिलाव सुरू आहेत. शेतकरी बांधवांसाठी भुईकाटा, गोदाम, कॅन्टीन, पिण्याच्या पाण्याचा आर.ओ. प्लांट, पाण्याची टाकी, कार्यालयीन इमारत आदी सुविधा निर्माण केल्या आहेत. विंचूर उपबाजार आवारात शेतमालाला मिळणारा योग्य बाजारभाव, व्यापारीवर्ग व बाजार समितीकडून मिळणाऱ्या उत्तम सुविधांमुळे विंचूर उपबाजार आवारावर अल्पावधीतच शेतीमालाची आवक वाढून उपलब्ध जागा अपुरी पडू लागली. अपुऱ्या जागेचा अभाव लक्षात घेता २०२१ मध्ये तत्कालीन सभापती सुवर्णा जगताप व संचालक मंडळाने छत्रपती संभाजीनगर-नाशिक महामार्गालगत विंचूर औद्योगिक वसाहतीजवळील सुभाषनगर ग्रामपंचायत हद्दीतील ८ हेक्टर ६१.५६ आर जागा शासकीय दराने खरेदी करून देण्याचा प्रस्ताव महसूल विभागाकडे पाठविला होता.



सुवर्णा जगताप, बाळासाहेब क्षीरसागर व विद्यमान सभापती ज्ञानेश्वर जगताप आदींसह सर्व संचालक मंडळाने वेळोवेळी संबंधित मंत्री महोदयांकडे केलेल्या पाठपुराव्याचे फलित म्हणून महाराष्ट्र शासनाने ६ ऑगस्ट २०२५ रोजी लासलगाव बाजार समितीच्या विंचूर उपबाजार आवाराकरिता सुभाषनगर ग्रामपंचायत हद्दीतील जागा उपबाजार या सार्वजनिक प्रयोजनासाठी नाममात्र एक रुपये दराने कब्जेहक्काची रक्कम आकारून व वसूल करून मंजूर केल्याचे कळविले आहे. बाजार समितीस शासकीय दराने जागा संपादित करून मिळण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार,महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री छगन भुजबळ, पणनमंत्री जयकुमार रावल, आ. दिलीप बनकर, बाजार समितीचे ज्येष्ठ संचालक जयदत्त होळकर, पंढरीनाथ थोरे, राजेंद्र डोखळे, सुभाषनगरचे सरपंच, उपसरपंच, सचिव सचिव नरेंद्र वाढवणे आदींचे सहकार्य लाभल्याचे जगताप यांनी सांगितले.

> शासकीय दराने मंजूर जागेत शेतकरी बांधवांसाठी प्रशस्त बाजार आवार, वॉल कंपाउंड, काँक्रिटीकरण, भुईकाटा, पिण्याचे पाणी, शेतकरी निवास, कार्यालयीन इमारत आदी आवश्यक सोयीसुविधा निर्माण करून कांदा, भुसार, तेलबिया, बेदाणा, फळे व भाजीपाला आदी शेतीमालाचे लिलाव सुरू करण्याचे प्रयोजन आहे.
>
> **ज्ञानेश्वर जगताप, सभापती, बाजार समिती, लासलगाव**

## खैरखेडा येथे वीज पडल्याने बैलाचा दुर्दैवी मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड**

गावाकडे पावसाळ्याच्या काळात विजांचा कडकडाट आणि वीज पडण्याच्या घटना सर्रास घडतात. अशाच एका घटनेत वीज पडून शेतकऱ्याच्या बैलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली ही घटना पुसद तालुक्यातील खैरखेडा येथे घडली

पावसाळ्याच्या दिवसात शेतकरी नामे प्रकाश धोंडबा खंदारे हे आपला बैल जोड घेवून शेतात काम करत होते

अचानक आकाशात विजांचा कडकडाट झाला आणि काही क्षणांत वीज थेट बैलावर कोसळली या घटनेत एक बैल जागीच मृत झाला, तर दुसरा बैल गंभीर जखमी झाला वेळेत व्हेटर्नरी चमू पोहचली आणि त्यामुळे 1 बैलाचा जीव वाचला शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले बैल हा शेतकऱ्याचा प्रमुख साथीदार असतो एक बैल सुमारे ₹50,000 ते ₹1,00,000 किंमतीचा असतो बैल दगावल्यानं शेतकऱ्यावर उपजीविकेचा प्रश्न उभा राहतो.

अशा घटनेत शासनामार्फत आपत्ती निवारण निधीतून नुकसान भरपाई देण्याची तरतूद असते शेतकऱ्यांनी तात्काळ ग्रामसेवक, तलाठी व पशुवैद्यक अधिकाऱ्यांना माहिती दिली आहे पंचनामा झाला आहे शेतकऱ्याला लवकर भरपाई मिळाली पाहिजे यासाठी शेतकरी प्रतीक्षेत आहे.



## अर्धांगिनी एक पूर्णत्व" संस्थेतर्फे ज्येष्ठ शिक्षिका सौ.शशिकला जाधव हिचा "सन्मान तिच्या कर्तृत्वाचा" म्हणून होणार गौरव

**दैनिक युवक आधार**
**मुंबई:- (प्रमोद तरळ)**

रयत शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालय चारकोप येथील शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका व 'ग्रंथ तुमच्या दारी' मुंबईच्या समन्वयक सौ. शशिकला किरण जाधव मॅडम या करीत असलेल्या सामाजिक कार्याची ज्यामध्ये अंधश्रद्धा निर्मूलनाबाबत आणि जादूटोणाविरोधी कायद्याबाबत करीत असलेले सामाजिक कार्य, मराठी भाषा वृद्धिंगत करण्याबाबत करीत असलेले कार्य, कॅन्सर रुग्णांकरिता करीत असलेल्या कार्याबाबत, देहदान आणि अवयवदान बाबत करीत असलेले जनजागृती कार्य, विद्यार्थ्यांमध्ये लैंगिक शिक्षण आणि व्यसनमुक्तीबाबत करीत असलेले कार्य, योगाभ्यास क्षेत्रात करीत असलेले कार्य, समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याबाबत करीत असलेले कार्य इत्यादी कार्याची दखल घेऊन "अर्धांगिनी एक पूर्णत्व" या सामाजिक संस्थेमार्फत ' सन्मान तिच्या कर्तुत्वाचा' म्हणून गौरव करण्यात येणार आहे. येत्या सोमवारी ११ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी मंदिर नाट्यगृहात सदर सत्कार सोहळा असणार आहे.सौ.जाधव मॅडम यांचे होत असलेल्या सन्माना बद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

## "दैनिक युवक आधारच्या बातमीनंतर मनसे सक्रिय – BMC कडून तत्काळ कृती"


दैनिक युवक आधार
Page 1
Jun 2025
दृष्य सत्य
जनतेच्या नजरेतून
शासनाच्या दरबारात
कचऱ्याचा ढिगारा लादी कामामुळे, रहिवाशांना त्रास
जोगेश्वरी (पूर्व), दि. १७ जून २०२५ –
दैनिक युवक आधार
किशोर गुडेकर
मुंबई विभाग प्रमुख

**दैनिक युवक आधार**
**- किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

मुंबई – जोगेश्वरी (पूर्व) मनसेच्या तक्रारीनंतर तत्काळ पालिका कारवाई

जुने फुटलेले कचरा पेटी हटवून नवीन बसवले – रहिवाशांनी मानले मनसेचे आभार

दैनिक युवक आधारने ही बातमी सर्वप्रथम प्रकाशित केली होती

जोगेश्वरी (पूर्व), गांधी नगर –

जोगेश्वरी पूर्वेतील गांधी नगर येथील जनता कॉलनीमधील रहिवासी गेल्या काही दिवसांपासून डॉ. यादव क्लिनिक समोरील दोन कचरा पेट्यांमुळे त्रस्त होते. या पेट्या पूर्णपणे तुटलेल्या, ओसंडून वाहणाऱ्या आणि दुर्गंधीयुक्त अवस्थेत होत्या. त्यामुळे परिसरात अस्वच्छता आणि दुर्गंधीचा त्रास वाढल्याने आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता.




ही समस्या लक्षात घेत मनसेचे कार्यकर्ते निलेश दुर्वास खोत यांनी तात्काळ लक्ष घातले. त्यांनी BMC च्या अधिकृत संकेतस्थळावर व ट्विटरद्वारे तक्रार नोंदवली. याची तात्काळ दखल घेत K/पूर्व वॉर्ड कार्यालय यांनी तत्परतेने कारवाई करत, जुन्या फुटक्या पेट्या हटवून काहीच दिवसांत नवीन कचरा पेट्या बसविल्या. या वेळी स्थानिक रहिवाशांनी मनसेच्या सक्रियतेचे कौतुक केले असून, "वेळीच सार्वजनिक तक्रार केल्यास प्रशासन हालचाल करते," हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

दैनिक युवक आधारने ही समस्या सर्वप्रथम उजेडात आणून प्रकाशित केली होती.

## श्री. मांगीरबाबा यात्रेनिमित्त आलेल्या भाविकांचे आमदार अब्दुल सत्तार यांच्याकडून स्वागत

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :-योगेश पालोदकर**

सिल्लोड :- दि.8, मंगरूळ ता. सिल्लोड येथे श्री. मांगीरबाबा यात्रा उत्सव निमित्त नेवासा ते मंगरूळ पायी आलेल्या भाविकांच्या दिंडीचे आमदार अब्दुल सत्तार यांनी स्वागत केले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथे हा कार्यक्रम पार पडला. यावेळी आमदार अब्दुल सत्तार मित्र मंडळाच्या वतीने श्री. मांगीरबाबा यात्रेसाठी आलेल्या भाविकांसाठी फराळाची व्यवस्था करण्यात आली होती. आमदार अब्दुल सत्तार यांनी यावेळी उपस्थित भाविकांशी संवाद साधत त्यांना श्री. मांगीरबाबा यात्रा उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, शिवसेना महिला आघाडीच्या दुर्गाबाई पवार, शिवसेना जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल, नॅशनल सहकरी सूतगिरणीचे संचालक विठ्ठल सपकाळ, शंकरराव खांडवे, कृउबा समितीचे संचालक शेख जावेद, राजेंद्र साठे, अशोक कांबळे, फहिम पठाण, रमेश भारस्कार, विशाल सरोदे, गणेश सरोदे, बबन सरोदे आदिंसह भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



## रत्नागिरी जिल्हा अजिंक्य पद तायक्वांदो स्पर्धेत ओणीची सुकन्या परी संजय जडयार हिने पटकावले रौप्य पदक

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण :- (प्रमोद तरळ)**

येथे पार पडलेल्या २५ व्या जिल्हा अजिंक्य पद तायक्वांदो स्पर्धेत ओणीची सुकन्या आणि लांजा तालुका तायक्वांदो फिटनेस अकॅडमीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या कुमारी परी संजय जडयार हिने रौप्य पदक पटकावले आहे.

कु.परी ही महाराष्ट्र नवनिर्माण सेना राजापूर तालुका सचिव श्री.संजय विष्णू जडयार (गोरुळेवाडी) ओणी यांची ती कन्या आहे. तिच्या या यशात तिचे गुरू तेजस्विनी आचरेकर मॅडम (राष्ट्रीय पंच, प्रशिक्षक,), तेजस पावसकर सर, गौरव खेडेकर सर, शीतल आचरेकर मॅडम,आई पायल जडयार इत्यादीचे मार्गदर्शन लाभले. कु परी ही अत्यंत हुशार व गुणी खेळाडू असून तीने मिळवलेल्या या पदकामुळे तिच्यावर रत्नागिरी जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

## गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी दिलासा

### मुंबई-गोवा महामार्ग गणेशोत्सवपूर्वी खड्डेमुक्त करण्याचे मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे आश्वासन



**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

कोकणात दरवर्षीप्रमाणे लाखो चाकरमानी गणेशोत्सवासाठी प्रवास करत असतात. मात्र, मुंबई-गोवा महामार्गावरील रखडलेली कामे आणि खड्ड्यांमुळे होणारा त्रास या नागरिकांसाठी मोठा विषय ठरतो. ही बाब लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी गुरुवारी (७ ऑगस्ट) महामार्गावरील कामांची पाहणी करत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले की, गणेशोत्सवापूर्वी महामार्ग खड्डेमुक्त करण्यात यावा आणि प्रवाशांना कोणताही त्रास होऊ देऊ नये.पनवेल येथील पळस्पे फाटा येथून सुरु झालेल्या या पाहणी दौऱ्यात मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यासमवेत आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार रविंद्र पाटील आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महाड येथे आयोजित आढावा बैठकीत त्यांनी स्पष्ट निर्देश दिले की, महामार्गावरील कामे तातडीने पूर्ण करावीत आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी सर्व उपाययोजना करण्यात याव्यात.मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी स्पष्ट केले की, इंदापूर आणि माणगाव बायपास पुलांची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून नव्या ठेकेदारांची नेमणूक झालेली आहे. ही कामे पूर्ण होण्यासाठी किमान एक वर्ष लागणार आहे. दरम्यान, खोपोली-पाली या पर्यायी मार्गांची डागडुजी करणे, इंदापूर व माणगाव येथे पोलीस बंदोबस्त वाढवणे, आणि होमगार्डची मदत घेणे यासारख्या तत्काळ उपाययोजनांवर भर देण्यात येणार आहे."गणेशोत्सव कोकणवासीयांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा असून त्यांच्यासाठी हा प्रवास सुसह्य व्हावा, यासाठी शासन कटिबद्ध आहे," असे मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले.त्यांनी अधिकाऱ्यांना खालील प्रमुख सूचना दिल्याःखड्डे आणि अर्धवट काम पूर्ण न झालेल्या ठिकाणी पर्यायी व्यवस्था करावी. दिशादर्शक फलक, साईनबोर्ड, रिफ्लेक्टरची व्यवस्था तातडीने करावी. महामार्गालगतच्या अतिक्रमणांना हटवून 'नो पार्किंग झोन' निश्चित करावेत. महामार्गावर सुविधा केंद्रांची उभारणी करून नागरिकांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध कराव्यात.या पाहणी दौऱ्यात मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पळस्पे, पेण, वाशीनाका, गडब, खारपाले, कोलेटी अशा विविध ठिकाणी सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. स्थानिक नागरिकांशी संवाद साधून त्यांनी अनुभवलेल्या अडचणी जाणून घेतल्या व त्या तातडीने सोडवण्याचे आश्वासन दिले. दरम्यान, जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी महामार्गाच्या सद्यस्थितीची माहिती संगणकीय सादरीकरणाद्वारे दिली. मंत्री भोसले यांनी कागदोपत्री पूर्तता दाखवून प्रत्यक्षात कामे अपूर्ण असल्याबद्दल नाराजीही व्यक्त केली.मुंबई-गोवा महामार्गाची सध्या ९० ते ९५ टक्के कामे पूर्ण झाली असून उर्वरित काम पुढील एका वर्षात पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे, असेही मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी शेवटी स्पष्ट केले.

## नागरिकांनी मोदी सरकारच्या योजनांचा लाभ घ्यावा -लोकनेते रामशेठ ठाकूर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**



केंद्रातील मोदी सरकार हे विविध कल्याणकारी योजना नागरीकांसाठी राबवत आहे. या योजनांचा लाभ नागरीकांनी घ्यावा तसेच आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर ठाकूर यांनी रोजबाजार येथे आयोजीत करण्यात आलेल्या करण्यात आलेल्या आरोग्य तपासणी शिबिर आणि कल्याणकारी योजांच्या शिबिरावेळी केले. तसेच आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या शिबिराचे उद्घाटन डॉ. गिरीश गुणे यांच्या हस्ते यांच्या हस्ते झाले.

पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांच्या वाढदिवसानिमीत्त सामाजिक उपक्रम राबवण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार भारतीय जनता पक्ष कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत आणि पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या वतीने विविध कल्याणकारी योजना तसेच महिलांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. यामध्ये महिलांसाठी मोफत कॅन्सर तपासणी, मोफत आरोग्य मुल्यमापन तसेच प्रधानमंत्री श्रमयोगी पेन्शन योजना, राष्ट्रीय वयोश्री योजना, आयुष्मान भारत योजना, तसेच ज्येष्ठ नागरीक कार्ड योजनेचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याहस्ते झाले. या कार्यक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, तेजस कांडपीळे, डॉक्टर गिरीश गुणे, वर्षा ठाकूर, भाजप कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय पाटील, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, अमरीश मोकल, पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत, प्रितम म्हात्रे, सपना पाटील, लिना पाटील, कामगार मोर्चाचे उपाध्यक्ष अनिल खोपडे आदी उपस्थित होते.

दरम्यान, या कार्यक्रमामध्ये 54 महिलांची कॅन्सर तपासणी, 105 जणांचे आरोग्य मूल्यमापन करण्यात आले तसेच 27 जणांनी प्रधानमंत्री श्रमजीवी योजना, 84 जणांनी इंदिरा गांधी नॅशनल पेन्शन योजना तर 47 जणांनी आयुष्यमान भारत योजनेचे फॉर्म भरले.

## कामगार कल्याण मंडळाकडून नागपूर येथे समरगीत / स्फूर्तीगीत स्पर्धा

**प्रबोधनकार संघटनेचे भावेश कोटांगले व चमू करणार नेतृत्व**

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

नागपूर –महाराष्ट्र शासन कामगार विभाग महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ गट क्र.१ नागपूर च्या वतीने आयोजित गटस्तरीय सांघिक समरगीत/स्फूर्ती गीत स्पर्धा आज दि. ९ ऑगष्ट २०२५ रोजी ललित कला भवन इंदोरा नागपूर येथे आयोजित केलेली आहे. त्यामध्ये कामगार कल्याण केंद्र साकोली संघाच्या वतीने सतीश कुटे कामगार कल्याण केंद्र प्रमुख साकोली यांच्या नेतृत्वात प्रबोधनकार कला साहित्य संघटना साकोलीचे पदाधिकारी कलावंत समरगीत सादर करणार आहेत.त्यामध्ये भावेश कोटांगले, लक्ष्मीकांत बोरकर, संदिप कोटांगले, पितांबर सूर्यवंशी,वृषभ राणे, हासराम तुमसरे, अर्चना कान्हेकर, करिष्मा भाग्यवंत, संगीता पुस्तोडे, प्रज्ञाशील मेश्राम, खुशाल इठोले, अभिषेक रामटेके, प्रल्हाद भुजाडे यांची चमू सहभाग घेणार आहे.




सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# शास्त्री विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी चालक-वाहकांना बांधल्या राख्या.

**दैनिक युवक आधार**
**परतूर- जालना (अशोक ठोके)**

ज्यांच्यामुळे आपण दररोज शाळेत येऊ शकतो अशा एस. टी. महामंडळाच्या चालक आणि वाहकांच्या कार्याप्रति कृतज्ञता व्यक्त करत रक्षाबंधन सणाचे औचित्य साधत शिवाजीनगर भागातील लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी बसस्थानकावर जाऊन चालक आणि वाहकांना राख्या बांधल्या.दरम्यान, शाळेचे मुख्याध्यापक एल. के. बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली रक्षाबंधन सणाच्या पूर्वसंध्येला शुक्रवारी (दि. 8) विद्यार्थिनींनी हा उपक्रम राबवला.

येथील शिवाजीनगर भागातील लालबहादूर शास्त्री विद्यालयात शहरासह ग्रामीण भागातील मुले-मुली मोठ्या संख्येने शिक्षण घेण्यासाठी येतात. खास मुलींसाठी एस. टी. महामंडळाच्या वतीने मानव विकास योजनेअंतर्गत विविध गावांसाठी बसेस सोडण्यात येतात.बसचा लाभ घेत ग्रामीण भागातील मुली परतूर शहरात शिक्षणासाठी येतात. परतूर आगारातील चालक, वाहकांमुळे आपणाला दररोज शाळेत येणे शक्य होते तसेच शाळा सुटल्यानंतर वेळेत घरी पोहोचता येते अशी भावना व्यक्त करत विद्यार्थिनींनी रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून चालक, वाहकांना राख्या बांधल्या. दरम्यान, विद्यार्थिनींच्या या उपक्रमाचे शहरात कौतुक होत आहे. यावेळी पर्यवेक्षक राजकुमार राऊत, वैजनाथ तनपुरे, उद्धव मगर, शिवाजी आळणे,सांस्कृतिक विभाग प्रमुख बालाजी ढोबळे इतरांची उपस्थिती होती.



# महाराष्ट्राच्या आदिवासी परंपरेला वारली-प्रेरित हस्तचित्रित किटलीद्वारे अनोखी मानवंदना
## स्वातंत्र्य दिनानिमित्त टाटा टी प्रीमियम कडून 'देश का गर्व' मोहिम

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी**

८ ऑगस्ट २०२५ : 'टाटा टी प्रीमियम' आपल्या 'देश का गर्व' मोहिमेच्या २०२५ आवृत्तीच्या माध्यमातून भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला मान देण्याची परंपरा यापुढेही सुरू ठेवत आहे. दरवर्षी स्वातंत्र्यदिन साजरा करताना 'टाटा टी प्रीमियम' तर्फे चहाच्या दैनंदिन संस्कृतीला स्थानिक कलांशी जोडण्यात येते. त्यानुसार यंदा भारतातील प्रतिष्ठित कलाप्रकारांपासून प्रेरणा घेत तयार केलेल्या हस्तचित्रित किटलींच्या 'देश का गर्व' संग्रहामार्फत हा उपक्रम राबवला जात आहे. 'टाटा टी प्रीमियम' ने चहा संस्कृतीचा भाग असलेल्या वस्तूंमधून, मग तो साधा कुल्हड असो, चहाचा पारंपरिक कप असो किंवा यावर्षीची प्रातिनिधीक किटली, भारताची समृद्ध लोककला आणि प्रादेशिक कला सतत प्रकाशझोतात आणल्या आहेत. यातील प्रत्येक आवृत्ती केवळ सौंदर्यापुरती मर्यादित नसून, भारताच्या कलात्मक वारशाचे जतन, संवर्धन आणि पुढील पिढ्यांपर्यंत आधुनिकतेच्या आणि सार्थकतेच्या माध्यमातून पोहोचवणे हा उद्देश त्या मागे असतो. भारताच्या हस्तकलेचे सौंदर्य सगळे जग नव्याने शोधू लागले असताना, 'टाटा टी प्रीमियम देश की चाय' हा ब्रॅंड मात्र हे सौंदर्य आपल्या दैनंदिन जीवनात पूर्वीपासूनच साजरे करत आला आहे. यावर्षी




भारतीय लोककलेच्या संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या 'कौशलम' संस्थेच्या सहयोगाने 'देश का गर्व' संग्रहात प्रादेशिक कलाप्रकारांपासून प्रेरणा घेतलेल्या हस्तचित्रित किटल्या सादर करण्यात आल्या आहेत. या वर्षी 'टाटा टी प्रीमियम' ने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक म्हणून वारली कला सादर केली आहे. ही कला सह्याद्रीच्या कुशीत जन्मलेली एक आदिवासी चित्रशैली आहे. काळ्या-पांढऱ्या रेषांमधून उभी राहणारी, लयबद्ध शैलीत गोष्टी सांगणारी ही कला लावणीची नर्तिका, शनिवार वाडा, ढोल-ताशा आणि मोर यांसारख्या पारंपरिक प्रतीकांतून साकारली गेली आहे. पारंपरिक वारली शैलीत चित्रित केलेली ही मर्यादित आवृत्तीतील किटली, महाराष्ट्राच्या आदिवासी परंपरेला अर्पण केलेली एक जिवंत कलाकृती ठरते. पुनीत दास, पॅकेज्ड बेव्हरेजेस (भारत आणि दक्षिण आशिया) विभागाचे प्रमुख, टाटा कंझ्युमर प्रॉडक्ट्स म्हणाले,"टाटा टी प्रीमियम' मध्ये आमची स्थानिकतेवर आधारित धोरणे ही भारताच्या वैविध्यपूर्णतेवर आधारित आहेत आणि हे वैविध्यच आपल्या देशाची सर्वात मोठी ताकद आहे. 'देश का गर्व-प्रदेश की कला' या उपक्रमाच्या माध्यमातून आम्ही केवळ कलेचा गौरव करत नाही, तर भारताच्या सांस्कृतिक वारशाचे जतन करत आहोत. चहाच्या प्रत्येक किटलीतून एक अभिमानाची गोष्ट आम्ही उभी करीत आहोत, जी आता ग्राहकांच्या दैनंदिन जीवनाचा भाग ठरणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हा उपक्रम केवळ स्वातंत्र्य दिनापुरता न ठेवता, दररोजच्या आयुष्यातही भारतीय संस्कृतीचा उत्सव साजरा करण्याचा आमचा प्रयत्न आहे. यामध्ये आम्ही कला आणि तंत्रज्ञानाची ताकद वापरतो आणि त्याद्वारे काळ, स्थळ आणि पिढ्यांच्या मर्यादा पार करत, दृश्यात्मक आणि प्रभावी कथन सादर करतो. यंदाच्या आवृत्तीत, 'एआय'च्या सामर्थ्याचा उपयोग करून भारतीय कला जिवंत केली आहे आणि ती स्वातंत्र्य दिनाच्या गौरवास शोभेल अशीच झाली आहे." मृणालिका जैन भारद्वाज, संस्थापक, कौशलम संस्था यांनी सांगितले,"ही भागीदारी म्हणजे लोककलांना एक नवे माध्यम देण्याचा प्रयत्न आहे. परंपरा केवळ संग्रहालयात जपली जात नाही, तर ती रोजच्या आयुष्यातही जगली जाते, असे 'कौशलम'मध्ये आम्ही मानतो. या किटल्या केवळ उपयोगी वस्तू नाहीत, तर त्या संस्कृतीचे कथन करणाऱ्या जिवंत कॅनव्हास आहेत. टाटा टी प्रीमियमसारख्या भारतातील एक प्रतिष्ठित ब्रँडशी नाते जोडले गेल्याचा आम्हाला अभिमान वाटतो." 'देश का गर्व' संग्रह खास WWW.INDIAKICHAI.COM या संकेतस्थळावर विक्रीसाठी उपलब्ध असेल. या विक्रीतून मिळणारे उत्पन्न भारतीय लष्कराच्या कौशल्यविकास केंद्रांद्वारे महिलांच्या प्रशिक्षण व सक्षमीकरणासाठी शंभर टक्के वापरण्यात येणार आहे.

# विठ्ठलराव बरकुले यांची राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी अजित दादा पवार गटाच्या जिल्हा संघटक पदी निवड...

**दैनिक युवक आधार**
**जालना (अशोक ठोके)**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अजितदादा पवार गटाच्या जालना जिल्हा संघटक पदी विठ्ठलदादा बरकुले यांची जिल्हा अध्यक्ष अरविंद (अण्णा) चव्हाण यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन त्यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे परतूर तालुका अध्यक्ष असताना त्यांनी तळागाळातील लोकांना एकत्र करत पक्ष वाढीसाठी खूप काम केले आहे त्यांच संघटन कौशल्य अतिशय चांगलं असल्यामुळे पक्षाने जिल्हा संघटक पदाची धुरा त्यांच्या हाती सोपविण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीने जालना जिल्ह्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अधिक बळकट होईल अशी पक्षात व सर्व सामान्य जनतेत चर्चा आहे. त्यांनी अतिशय इमाने इतबारे पक्ष वाढीसाठी काम केलं आहे. विठ्ठलदादा बरकुले यांनी परतुर तालुक्यात केलेल्या कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर जिल्हा संघटक पदाची जिम्मेदारी देऊन त्यांनी आतापर्यंत केलेल्या कामाची एक प्रकारे पावतीच आहे. राष्टवादी कॉंग्रेस पक्षाला जिल्हात जिल्हा अध्यक्ष अरविंद (अण्णा) चव्हाण यांच्या नेतृत्वात जिल्ह्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अधिक बळकट होईल .यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी सेवादल जालना जिल्हा अध्यक्ष पद्माकरजी हांडे, सामाजिक न्याय विभागाचे प्रदेश सहसचिव रमेश पाईकराव, जालना तालुका अध्यक्ष ढेगळे यांची उपस्थिती होती तर सामाजिक न्याय विभाग परतूर तालुका अध्यक्ष प्रभाकर प्रधान,परतूर तालुका उपाध्यक्ष वहाबखा पठाण, तालुका उपाध्यक्ष सदाशिव शिरसाट, तालुका सचिव मदनराव ढवळे, ओ.बी.सी. तालुका अध्यक्ष अंशीरामजी थोरात, ओ.बी.सी.सेल जिल्हा उपाध्यक्ष हनुमंत दवंडे, अल्पसंखंक शहर अध्यक्ष बबलू मास्टर, तालुका कार्याध्यक्ष बाबासाहेब दिवटे, तालुका सचिव रोहिदास रोकडे, तालुका सहसचिव हनुमंत कवडे, श्रीष्टी सर्कल प्रमुख विष्णू पवार, सेवादल तालुका अध्यक्ष दिगंबर बोराडे, किसान सेल तालुका अध्यक्ष अशोक भदर्गे, महिला तालुका अध्यक्षा लता सदावर्ते, दिलीपराव खंदारे, शाहरुख कुरेशी यांनी त्यांचं अभिनंदन केले.

# शेकाप महिला आघाडी पनवेल महानगर पालिका जिल्हाअध्यक्ष पदी हर्षला तांबोळी यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल :वार्ताहर**



शेतकरी कामगार पक्षाच्या महिला आघाडी पनवेल महानगरपालिका जिल्हाध्यक्षपदी हर्षला योगेश तांबोळी यांची निवड करण्यात आली. या निवडीबद्दल त्यांचे विविध स्तरातून कौतुक आणि अभिनंदन केले जात आहे. हर्षला तांबोळी आणि त्यांचे पती योगेश तांबोळी हे शेतकरी कामगार पक्षात गेल्या अनेक वर्षांपासून काम करत आहेत. त्यांच्या कै. नारायण लक्ष्मण तांबोळी या संस्थेतर्फे त्यांनी विविध उपक्रम राबवले आहेत. आरोग्य शिबीर, नेत्र तपासणी, खाऊ वाटप, धान्यवाटप यासारखे सामाजिक उपक्रमात त्यांचा हातखंडा आहे. हर्षला तांबोळी यांची महिला जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्यामुळे त्यांचे माजी आमदार बाळाराम पाटील, माजी सभापती काशिनाथ पाटील यांच्यासह अनेक राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, मित्रपरिवार, पत्रकार यांच्याकडून अभिनंदन केले जात आहे.

# कोरटा गांव डोंगरी विकास योजनेतून वगळल्याने आदिवासी समाजाचा विकास होणार नाही
## उपविभागीय अधीकारी उमरखेड यांच्या मार्फत जिल्हाधिकारी यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड**

महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने दी.17 जुलै 2025 शासन निर्णयानुसार डोंगरी विकास विभाग कार्यक्रमाच्या सुधारित यादीतुन भौगोलिकदृष्टया डोंगरी असलेले कोरटा गांव वगळन्यात आले आहे. गावा संभोवताल चे सर्व गावे उदा . नारली, देंभुरदरा, एकांबा, मोरचंडी, चिखली, घडोली, सेवालाल नगर ,जवराला, दराटी, खरबी, टाकली (बंदी) काठी, कवठा, दहेली ई.यादीमधे समाविष्ट आसताना या गांवच्या माधोंमध असलेले कोरटा गांव मात्र वंचित असलयाने अन्याय होत आहे युवकांच्या मनात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या निर्णयामुळे शिक्षण,रस्ते, अरोग्य सेवा पाणीपुरवठा ई. पायाभूत सुविधा वर गंभीर परिणाम होणार आहे अशी भीती व्यक्त होत आहे.त्यामुळे शासनाने त्वरित या प्रश्नाकडे लक्ष घालून वंचित असलेलय कोरटा गावचा डोंगरी विकास योजनेत समावेश करावा अशी मागणी ट्राइबल फ़ोरम संगठना उमरखेड चे तालुका अध्यक्ष अरुण तिलेवाड, राजेश सोगें, वंदेश पिलवंड, संजय रनमले, बाबूश करवले, बजरंग पारडे यांनी उपविभागीय अधिकारी उमरखेड यांच्या कडे निवेदनातून केली आहे.




# नैताळे सोसायटीच्या चेअरमनपदी बाळासाहेब बोरगुडे तर व्हा.चेअरमनपदी संतोष सुरासे यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

नैताळे विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या सर्व संचालकांची महत्वाची बैठक निवडणूक अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी १ दत्तात्रेय नाईकरे यांच्या अध्यक्षतेखाली सहाय्यक निबंधक कार्यालय निफाड येथे बोलविण्यात आली होती यावेळी संस्थेच्या चेअरमनपदी रविंद्र उर्फ बाळासाहेब बोरगुडे तर व्हाईस चेअरमनपदी संतोष सुरासे यांची बिनविरोध निवड करण्यात आली निवड होताच सर्व समर्थकानी पेढे वाटून आनंद व्यक्त केला. नैताळे



विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेचे चेअरमन सर्जेराव बोरगुडे व व्हाईस चेअरमन निर्मला बोरगुडे यांनी अंतर्गत ठरलेल्या रोटेशन पध्दतीनुसार आपआपल्या पदाचे राजीनामे दिले होते सदरचे राजीनामा पत्र मंजुर झाल्याने नविन चेअरमन व व्हाईस चेअरमन निवडीसाठी बैठक बोलविण्यात आली होती यावेळी चेअरमन पदासाठी रविंद्र उर्फ बाळासाहेब बोरगुडे यांनी आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले त्यावर सुचक म्हणून रतन बोरगुडे व अनुमोदक म्हणून महेश बोरगुडे यांनी सह्या केल्या तर व्हाईस चेअरमनपदासाठी संतोष सुरासे यांनी आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले त्यावर सुचक म्हणून शिवाजी बोरगुडे यांनी तर अनुमोदक म्हणून देविदास बोरगुडे यांनी सह्या केल्या होत्या प्रत्येकी एक नामनिर्देशन पत्र निवडणूक अधिकाऱ्यांना विहित मुदतीत प्राप्त झाल्याने व ते छाननीत योग्य व बरोबर असल्याने निवडणूक अधिकारी दत्तात्रेय नाईकरे यांनी बिनविरोध निवड झाल्याची घोषना केली.या सभेस संचालक शिवाजी बोरगुडे, रतन बोरगुडे,महेश बोरगुडे,देवीदास बोरगुडे,दादा बोरगुडे ,संतोष घायाळ,नवनाथ भवर ,निर्मला बोरगुडे ,अरुन विघे ,यांच्यासह लासलगाव बाजार समितीचे संचालक राजेंद्र बोरगुडे ,माजी सरपंच संजय बोरगुडे ,नित्यानंद बोरगुडे,राजेंद्र बोरगुडे ,देवीदास डावखर ,बाळासाहेब बोरगुडे ,याकुब पठाण ,रविंद्र बोरगुडे ,दतु मोरे ,बापूसाहेब बोरगुडे सचिव भाऊराव दराडे,प्रभाकर घायाळ,योगेश बर्डे उपस्थित होते.निवड बिनविरोध झाल्यानंतर चेअरमन बाळासाहेब बोरगुडे व व्हाईस चेअरमन संतोष सुरासे यांचा सस्थेच्या कार्यालयात सभासद व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# ग्राम महसूल अधिकाऱ्यांच्या बायोमेट्रिक हजेरीला विरोध
## तहसीलदारामार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन

**दैनिक युवक आधार**
**महेश पेन्दोर घाटंजी (प्रतिनिधी):-**

ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्या बायोमेट्रिक फेस आयडी हजेरी सक्तीच्या निर्णयाला जोरदार विरोध दर्शवत विदर्भ पटवारी संघ, जिल्हा शाखा यवतमाळने तहसीलदारामार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले आहे.

"तलाठी हे क्षेत्रीय स्तरावरील अत्यंत महत्त्वाचे पद आहे. प्रत्येक तलाठीकडे ३ ते ४ गावांचा कारभार असतो. दिवसभर विविध ठिकाणी जाऊन महसूल संबंधित कामे करावी लागतात. अशा परिस्थितीत बायोमेट्रिक फेस आयडी हजेरी सक्ती करणे व्यवहार्य नाही. शासनाने वास्तव अडचणी लक्षात घेऊन हा निर्णय मागे घ्यावा, अन्यथा संघटनेला तीव्र भूमिका घ्यावी लागेल."
**रामेश्वर कुमरे, सहसचिव**
**उपविभाग केळापूर**




महाराष्ट्र राज्य तलाठी, पटवारी, मंडळ अधिकारी समन्वय महासंघाच्या निर्देशानुसार, २८ जुलै रोजी झालेल्या व्हिडिओ कॉन्फरन्स बैठकीत जिल्ह्यातील सर्व घटक संघटनांनी या निर्णयाविरोधात एकमत दर्शविले. महासंघाने नमूद केले की, ग्राम महसूल अधिकारी हे क्षेत्रीय पद असल्याने निश्चित कार्यालयीन ठिकाणी बसून हजेरी देणे अव्यवहार्य आहे. एका अधिकाऱ्याकडे तीन ते चार गावांचा कारभार असतो, त्यामुळे दिवसभर महसूल संबंधित कामासाठी विविध गावांमध्ये जावे लागते.

संघटनेने असा इशारा दिला आहे की, बायोमेट्रिक हजेरी सक्ती केली तर कामकाजात गंभीर अडथळे निर्माण होतील आणि महसूल विभागाची कार्यक्षमता कमी होईल. या संदर्भात १६ मुद्द्यांवरील तपशीलवार अडचणींचे पत्रकही निवेदनासोबत जोडण्यात आले आहे.

हे निवेदन तहसीलदार घाटंजी यांच्या माध्यमातून जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आले आहे. सरकारने वास्तव परिस्थिती लक्षात घेऊन हा निर्णय मागे घ्यावा, अन्यथा सर्व महसूल कर्मचारी एकत्रितपणे या कामास नकार देतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या निवेदनाची प्रत उपविभागीय अधिकारी यांनाही देण्यात आली आहे. आता जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय काय होणार याकडे महसूल कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# भावाच्या मायेची सावली

**(रक्षाबंधनाच्या निमित्ताने एका बहिणीचे मनोगत)**
**– नम्रता स्वरूप घोडके**

राखी म्हणजे नुसता एक धागा नव्हे, तर नात्यांच्या आठवणींना प्रेमाचा आणि विश्वासाचा गुंता असतो. या नात्याच्या एका टोकाला भाऊ असतो आणि दुसऱ्या टोकाला बहिणीचं न बोलताही खूप काही सांगणारं मन. राखीचा धागा हातात बांधला जातो, तेव्हा तो केवळ एक नातं नसतो – तर भावना बोलक्या होतात: प्रेम, विश्वास, काळजी... आणि मन भरून येतं.

माझं आणि माझ्या भावाचं नातं असंच काहीसं आहे – त्याचं हळवं मन शब्दात मांडणं खूप कठीण आहे.

तो केवळ माझा भाऊ नाही, तर माझं बळ आहे, माझी सावली आहे – जी नेहमी माझ्या मागे असते, शांतपणे, विश्वासाने, निस्वार्थ प्रेमाने. माझा आधार आहे तो. आणि माझ्या मागे खंबीरपणे उभा राहतो. आतापर्यंत त्याने माझं प्रत्येक म्हणणं जपलं आहे. मी काही मागितलं नाही तरी त्याला माहीत असतं मला काय हवं आहे. कधी कधी मला आश्चर्य वाटतं – माझ्या शब्दांमधलं ओलावं त्याला शब्दांशिवाय कसं जाणवतं?

मी चुकीची असले तरी तो मला दोष देत नाही, समजून घेतो, समजावतो. आणि त्याचं म्हणणंही मला पटतं.

तो माझ्यासाठी एक असं व्यक्तिमत्त्व आहे, ज्याच्यावर मी डोळे झाकून विश्वास ठेवते.

माझ्या मनात त्याच्याबद्दल केवळ प्रेमच नाही तर गाढ आदर आहे. त्याने मला कधीच सामान्य वाटू दिलं नाही – उलट नेहमी मला खास वाटेल असंच वागलाय. शेतात राबणारे त्याचे हात – जेव्हा मी



माहेरून निघताना पैसे देतात – तेव्हा ते हात मला मोठे वाटतात. त्या पैशांमागे त्याचं मन आहे, माय आहे, काळजी आहे. जर तो घरात नसेल, तर माझा पाय घराबाहेर पडत नाही. कारण निरोप देण्यासाठी त्याचं असणं हेच माझं माहेरपण आहे.

तो नेहमी म्हणतो:
"मी प्रत्येक संकटात तुझ्या सोबत आहे."

...आणि त्याने ते मनापासून जपलं आहे.
तो कधी भाऊ वाटतो, कधी मित्र, कधी छत्रछाया.

कधी त्याच्या काळजात जागा मिळते, कधी त्याच्या डोळ्यात माझा अभिमान दिसतो.

कधी कधी वाटतं – जर देव अस्तित्वात असेल, तर त्यांनीच त्याला माझ्यासाठी पाठवलंय.

त्याला नमस्कार करताना असं वाटतं... देवालाच नमस्कार करते आहे.

सगळ्यांना अशा नात्याचं सौख्य मिळो असं नाही, पण ज्यांच्या नशिबात आहे – त्यांच्यासाठी हे खरंच देवाचं वरदान आहे.

आजच्या काळात अशी नाती दुर्मिळ होत चालली आहेत – धावपळ, तणाव, अहंकार, गैरसमज यामुळे नात्यांमध्ये दुरावा निर्माण होतोय.

पण अजूनही अशा नात्यांचा एक धागा शिल्लक आहे, जो धाग्याने नव्हे तर काळजीने, विश्वासाने, आणि निस्वार्थ प्रेमाने विणलेला आहे.

रक्षाबंधन हे त्याचं स्मरण – केवळ एका दिवसाचं नव्हे, तर आयुष्यभरासाठीचं!

**शेवटी एवढंच सांगते:**
**"लाडक्या भाऊराया, मी नेहमी तुझ्या सोबत आहे."**

# महिलांचे प्रत्येक क्षेत्रात सक्षम स्थान -अॅड.माधवी नाईक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**





अष्टावधानी असण्याचे वरदान हे महिलांनाच आहे. त्यामुळे महिला ज्या क्षेत्रात पाऊल टाकेल त्यामध्ये ती सक्षमतेने स्वतःचे स्थान निर्माण करून शकते, असे प्रतिपादन भाजपच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस तथा विमानतळ प्राधिकरणाच्या स्वतंत्र संचालीका अॅड.माधवी नाईक यांनी पनवेलमध्ये महिलांसाठी आयोजीत केलेल्या कार्यक्रमावेळी केले. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शकुंतला ठाकूर यांनीही भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

भाजप महिला मोर्चा पनवेल शहर तर्फे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच हातमाग दिवसाचे औचित्यसाधून वस्त्रवारसा हातमाग साडी प्रदर्शन, फॅशन शो तसेच खेळ पैठणीच्या कार्यक्रमाचे आयोजन आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात केले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपच्या महाराष्ट्र प्रदेश सरटिणीस तथा विमानतळ प्रधिकरणाच्या स्वतंत्र संचालीका अॅडव्होकेट माधवी नाईक यांच्याहस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत झाले. पनवेलकरांनी या प्रदर्शनाला भरभरून प्रतिसाद दिला. भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्ष रुचिता लोंढे आणि पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंझाराव यांच्या पुढाकाराने आयोजित प्रदर्शनात विविध प्रकारचे हातमाग साड्यांचे स्टॉल्स लावण्यात आलेत. यामध्ये विणलेल्या पैठणी साड्या, तसेच अन्य पारंपरिक हातमागावरील वस्तूंचे प्रदर्शन करण्यात आले. याव्यतिरिक्त, खेळ पैठणीचा यांसारखे मनोरंजक खेळही आयोजित करण्यात आले होते,, ज्यामुळे महिलांचा सहभाग अधिक वाढला. या कार्यक्रमाची आणखी एक खास बाब म्हणजे, फॅशन शो! या फॅशन शो मध्ये महिलांनी हातमागावरील साड्या परिधान करून रॅम्प वॉक केला. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी तुम्ही दिलेल्या शुभेच्छा आणि आर्शिवादामुळे मला अधिक काम करण्याची उर्जा मिळते असे सांगून आयोजकांचे कौतुक केले.

या कार्यक्रमाला अनेक सामाजिक संस्था, बचत गट आणि महिला मंडळांनी सक्रिय सहभाग घेतला. यामध्ये साईनगर चॅनल उपवन, अभिनव महिला मंडळ, नाच गा घुमा, गार्गीज ग्रुप, जागृती महिला मंडळ, रमाई महिला मंडळ, पनवेल स्मार्ट मॉमीस, स्वयंसहाय्यता महिला मंडळ, जी.एस फाऊंडेशन, जय भवानी महिला मंडळ, एकविरा महिला मंडळ, लहुजी महिला मंडळ, ज्येष्ठ नागरिक संघ, श्री समर्थ महिला मंडळ यांचा समावेश होते. त्यांच्या सहकार्यामुळेच हा कार्यक्रम यशस्वी झाला. दरम्यान, खेळ पैठणीच्या कार्यक्रमात विजेत्या महिलालेला पैठणीसाठी आणि पीएनजीतर्फे सोन्याची नथ आणि इतर स्पर्धकांना विविध आकर्षित बक्षिसे मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. तसेच या वेळी लकी ड्रॉ काढण्यात आला असून विजेत्यांनाही आकर्षक बक्षिसे देण्यात आली.

या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस चारुशीला घरत, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, मोहिनी पाटील, ममता म्हात्रे, माजी नगरसेवक गणेश कडू, माजी नगरसेविका दर्शना भोईर, हेमलता म्हात्रे, प्रीती जार्ज, राजेश्री वावेकर, वृषाली वाघमारे, नीता माळी, वर्षा नाईक, सुजाता ठक्कर, शहर सरचिटणीस अमित ओझे, रूपेश नागवेकर, उपाध्यक्ष प्रितम म्हात्रे, साधना पाटील, लीना पाटील, समीना साठी, प्रकाशन यमुना यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

---

# चौथी व सातवीचीही शिष्यवृत्ती परीक्षा होणार

## स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विद्यार्थ्यांना संधी

**मुंबई :** जिल्हा परिषद, नगरपरिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेपासून वंचित राहतात. त्यामुळे या विद्यार्थ्यांसाठी राज्य परीक्षा परिषदेने फेब्रुवारी २०२६ मध्ये इयत्ता पाचवी, आठवीबरोबर चौथी व सातवीचीही शिष्यवृत्ती परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे पुन्हा स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विद्यार्थ्यांना परीक्षेला बसण्याची संधी मिळणार आहे.

### आठ दिवसांमध्ये शासन निर्णय घेणार



सध्याच्या नियमानुसार इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करून घेण्यात येत आहे. मात्र शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी घेतलेल्या नव्या निर्णयामुळे ग्रामीण भागातील सरकारी शाळा व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेसाठी तयारी करून घेतली जाणार आहे. यासंदर्भातील शासन निर्णय पुढील आठ दिवसांमध्ये काढण्यात येईल, अशी माहिती शिक्षण विभागातील एका अधिकाऱ्याने दिली.

राज्यामध्ये १९५६ पासून इयत्ता चौथी आणि सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येत होती. मात्र शिक्षण हक्क कायद्यानुसार प्राथमिक व माध्यमिक वर्गांमध्ये बदल झाल्यामुळे २०१६ पासून इयत्ता पाचवी व आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा सुरू करण्यात आली. मात्र जिल्हा परिषद, नगरपरिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा चौथी किंवा सातवीपर्यंतच असल्याने यामधील विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेपासून वंचित राहिले. शाळांमध्ये शिष्यवृत्ती परीक्षा होत नसल्याने याचा मोठा फटका विद्यार्थी, पालकांसह शाळांना बसला. परिणामी या शाळांतील विद्यार्थी पटसंख्या वेगाने कमी होऊ लागली. त्यामुळे शिक्षक संघटनांनी राज्य परीक्षा परिषदेसह शिक्षण मंत्र्यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. त्यामुळे शिष्यवृत्ती परीक्षा ही इयत्ता पाचवी व आठवीबरोबरच इयत्ता चौथी व सातवीचीही घेण्याचा निर्णय घेतला.

---

# वरळी कोळीवाड्यात शिंदे-आदित्य ठाकरे आमनेसामने

## जोरदार घोषणाबाजीमुळे कोळीवाड्यात तणाव

**मुंबई :** नारळी पौर्णिमेनिमित्त शुक्रवारी वरळी कोळीवाड्यात युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ आमनेसामने आल्याचा प्रसंग घडला. यावेळी शिंदे सेनेचे कार्यकर्ते आणि आदित्य ठाकरे यांचे कार्यकर्ते यांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे कोळीवाड्यात काही वेळ तणाव निर्माण झाला. परंतु पोलिसांनी हस्तक्षेप केल्याने पुढील संघर्ष टळला.

नारळी पौर्णिमेनिमित्त कोळी बांधवांना शुभेच्छा देण्यासाठी वरळीचे आमदार आदित्य ठाकरे कोळीवाड्यात दाखल झाले होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कोळीवाड्यातून बाहेर पडत होते. यावेळी दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे येथे काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. वेळीच पोलिसांनी हस्तक्षेप करत दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांना दूर केले. वेळीच पोलिसांनी हस्तक्षेप केल्याने पुढचा संघर्ष टळला. दरम्यान नारळी पौर्णिमेनिमित्त वरळी कोळीवाड्यात शुक्रवारी मोठी गर्दी झाली होती.

दरम्यान यावर आदित्य ठाकरे म्हणाले की, काही लोकांना महत्त्व द्यायचे नसते तसे आम्ही देत नाही. राहुल गांधी यांनी गुरुवारी निवडणूक आयोगाला एक्सपोझ केले आहे. त्यामुळे ही मंडळी कशी सरकारमध्ये आणि डोक्यावर बसली हे जगभरात कळलेले आहे.

---

# ऑनलाइन आणि ऑफलाइन तिकीट बुकिंगमध्ये फरक नाही

## मनोरंजन शुल्क कायद्यातील सातवी तरतूद न्यायालयाकडून वैध



### न्यायालयाचे निरीक्षण

कलम २(ब)(iv) हा कराचा एक मापन आहे, असे नमूद करीत न्यायालयाने ऑनलाइन तिकीट बुकिंग आणि ऑफलाइन तिकीट बुकिंगमध्ये फरक असल्याचे मान्य करण्यास स्पष्ट नकार दिला. ऑनलाइन तिकीट बुकिंग शुल्क थेट मनोरंजनासाठी तिकीट खरेदीशी जोडलेले आहे. त्याशिवाय व्यक्ती थिएटरमध्ये प्रवेश करू शकत नाही. मनोरंजन क्षेत्रात व क्षेत्राबाहेर असा फरक करण्याचा प्रयत्न अनावश्यक आहे, असेही निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आणि रिट याचिका फेटाळली.

**मुंबई :** महाराष्ट्र मनोरंजन शुल्क कायद्याच्या कलम २(ब) मध्ये समाविष्ट केलेल्या सातव्या तरतुदीची घटनात्मक वैधता उच्च न्यायालयाने कायम ठेवली आहे. सिनेमा मालकांकडून चित्रपट तिकिटांच्या ऑनलाइन बुकिंगसाठी आकारल्या जाणाऱ्या अतिरिक्त रकमेचा या तरतुदीमध्ये समावेश होतो. ऑनलाइन बुकिंगची प्रक्रिया ही ऑफलाइन बुकिंगपेक्षा वेगळी नाही. ऑनलाइन बुकिंगबाबत यादी-२ च्या एंट्री ६२ अंतर्गत कर आकारला जाऊ शकतो, असे निरिक्षण नोंदवत न्यायालयाने सातवी तरतूद वैध ठरवली.

मल्टिप्लेक्स थिएटर्सची संघटना असलेल्या एफआयसीसीआय-मल्टीप्लेक्स असोसिएशन ऑफ इंडियाने उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. त्या याचिकेवर न्यायमूर्ती महेश सोनक आणि न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. महाराष्ट्र मनोरंजन शुल्क कायद्याच्या कलम २(ब) मध्ये सातव्या तरतुदीचा समावेश करण्याला याचिकेतून आव्हान देण्यात आले होते.

---

# अब्दुल सत्तार यांना सिल्लोड न्यायालयाचा पुन्हा एकदा दणका.

## डिजिटल प्रेस मीडिया व वर्तमानपत्रे यावर न्यायालय बंधने आणू शकत नाही.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**



**सिल्लोड-** सोयगाव मतदार संघाचे शिंदे गटाचे आमदार माजी मंत्री अब्दुल सत्तार अब्दुल नबी यांना सिल्लोड न्यायालयाने पुन्हा एकदा दणका दिला आहे. सिल्लोड येथील सामाजिक कार्यकर्ता महेश शंकरपेल्ली यांनी अब्दुल सत्तार यांच्या 2019 विधानसभा निवडणूक मधील नामनिर्देशन पत्रातील शपथपत्राबाबत सिल्लोड न्यायालयात फौजदारी याचिका क्रमांक 461/2023 दाखल केलेली आहे. शपथपत्रात अब्दुल सत्तार यांनी भ्रामक व खोटी माहिती दिली असा त्यांच्यावर आरोप आहे. मागील तीन वर्षापासून सदर प्रकरणी न्यायालयात सुनावणी सुरू आहे. फिर्यादी यांनी सदर प्रकरणी खासदार/ आमदार यांच्या फौजदारी प्रकरणात ट्रायल कोर्टात सुनावणी फास्ट ट्रॅक वर घेण्याचे मा. सुप्रीम कोर्टाच्या निर्देश असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यानुसार न्यायालयाने सदर याचिका प्राधान्य क्रमाने न्यायालयाच्या कामकाजाच्या प्रत्येक आठवड्याच्या शेवटच्या दिवशी चालवण्याचे आदेश 03/05/2025 रोजी दिले होते. सदर आदेशाबाबत डिजिटल प्रेस मीडिया व प्रिंट मीडिया यांनी मोठ्या प्रमाणात बातम्या प्रसिद्ध केल्या होत्या. त्यामुळे अब्दुल सत्तार यांच्या विधीज्ञ यांनी न्यायालयात अर्ज देऊन, फिर्यादी न्यायालयाचा आधार घेऊन खोट्या प्रसिद्ध करत असून आमची समाज माध्यमात बदनामी करत आहे. त्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी केली होती. या अर्जाबाबत दोन्ही पक्षामार्फत युक्तिवाद सादर केल्यानंतर न्यायमूर्ती श्री के.टी. अढायके यांनी अब्दुल सत्तार यांचा अर्ज फेटाळला आहे. आदेशात न्यायालयाने पुढील महत्त्वपूर्ण निष्कर्ष नोंदवले आहे. भारतीय संविधानाने कलम 19 नुसार देशातील प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले असून, प्रसार माध्यमांना सुद्धा तसे स्वातंत्र्य दिलेले आहे. माध्यमाने कोणत्या बातम्या लावाव्यात कोणत्या लावू नयेत यावर न्यायालय बंधने आणू शकत नाही. त्यासाठी शासनाने नियमन करण्यासाठी विशिष्ट यंत्रणा निर्माण केली आहे. त्यामुळे न्यायालय फिर्यादी किंवा प्रसिद्धी माध्यमांना सरसकट आरोपी विरुद्ध बातम्या प्रसिद्ध करू नये असे बंधने घालू शकत नाही. असे नमूद करून अब्दुल सत्तार यांचा अर्ज फेटाळत त्यांना पुन्हा एकदा दणका दिला आहे.

> प्रसार माध्यमे ही भारतीय लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असून, भारतातील नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला बाधा निर्माण करता येत नाही. न्यायालयाचे आदेश भारतीय संविधान व लोकशाही सशक्त करणारे आहेत.
> **- महेश शंकरपेल्ली**
> **फिर्यादी**

---

# नैसर्गिक वाळू पेक्षा कृत्रिम वाळूचा अधिक वापर व्हावा

## जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर बचतभवन येथे कृत्रिम वाळूवर परिसंवाद

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्स्ना कवाडे नागपूर विदर्भ सचिव**





नागपूर,दि. 07 : अलिकडच्या काळात नागरीकीकरण, शहर-महानगरांचा विस्तार, औद्योगिक वसाहती या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने स्वाभिविकच बांधकाम क्षेत्रासाठी लागणाऱ्या साहित्याची मागणी वाढली आहे. यात वाळू हा घटक पूर्णतः नैसर्गिक असल्याने त्याच्या वारेमाप उपस्यामुळे मोठ्या प्रमाणात नद्या व तिच्या परिसंस्थेला धोका निर्माण झाला. एका बाजूला वाळूची वाढती मागणी व दुसऱ्या बाजूला तिचे मर्यादित असलेले स्वरुप लक्षात घेऊन शासनाने कृत्रिम वाळूबाबत धोरणात्मक निर्णय घेतला आहे. निसर्गावर, नद्यांवर मर्यादित असलेल्या वाळूवर घाला घालण्यापेक्षा त्याच्या इतकाच बांधकामाला भक्कमपणा देणारा नैसर्गिक रेतीसाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी केले.

महसूल सप्ताहाच्या निमित्ताने बचत भवन येथे कृत्रिम वाळू धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आयोजित परिसंवादात ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, व्हीएनआयटी येथील सिव्हील विभागाचे प्रमुख प्रो. राहुल राळेगावकर, खनिकर्म उपसंचालक श्रीराम कडू, जिल्हा खनिकर्म अधिकारी डॉ. अतुल दोड, जिल्ह्यातील विविध खदान व क्रक्षरधारक उपस्थित होते.

नागपूर जिल्ह्यामध्ये कृत्रिम रेतीसाठी लागणारा दगड मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. ज्या-ज्या भागात शासन निर्णयानुसार दगडखाणीसाठी जागा उपलब्ध आहे त्या ठिकाणी कृत्रिम रेती तयार करणारे एमसँड युनिट उभारले जावेत यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन त्याला चालना देण्याचे निर्देश दिले आहेत. यादृष्टीने नागपूर जिल्ह्यासाठी 50 उद्योजकांना संधी देऊ केली आहे. हे 50 उद्योजक जे प्रथम नोंदणीधारक आहे अशा 50 क्रमांकापर्यंत निवड करुन जिल्हा खनिकर्म विभाग त्यांना योग्य ते सहाय्य करेल, असे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी सांगितले. कृत्रिम वाळूची गरज केवळ महाराष्ट्राची नाही तर ती जागतिक झाली आहे. पूर्वी लागणाऱ्या वाळूच्या प्रमाणात दुपटीने वाढ झाल्यामुळे ती मागणी नैसर्गिक वाळूतून पूर्ण होणे शक्य नाही. यादृष्टीने विचार करता कृत्रिम वाळूच्या निर्मितीशिवाय इतर सक्षम पर्याय उपलब्ध नसल्याचे व्हीएनआयटीचे सिव्हील विभागाचे प्रो. राहू राळेगावकर यांनी सांगितले. जगातील अनेक संशोधकांनी कृत्रिम वाळूला प्रमाणित केले असून त्याचा अधिकाधिक वापराला चालणा देण्याची गरज असल्याचे सांगितले आहे. हे लक्षात घेता आपण सर्वांनी कृत्रिम वाळूसाठी आग्रह धरला पाहिजे असे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा खनिकर्म अधिकारी डॉ. अतुल दोड यांनी प्रारंभी सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे संचालन श्रीमती प्रिती चुटे यांनी केले. या परिसंवादाला बांधकाम क्षेत्रातील अनेक उद्योजक उपस्थित होते.

---

# करंजाडेमध्ये दुर्गामाता मंदिराचा जिर्णोद्धार सोहळा

## गणेशगिरी महाराजांच्या हस्ते होणार देवीची प्राणप्रतिष्ठा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/प्रतिनिधीः***



करंजाडे येथे प.पू. गगनगिरी महाराज व स्व. सदाशिव तुकाराम साबळे यांच्या आशिर्वादाने 8 ऑगस्ट ते 10 ऑगस्ट श्री दुर्गामाता मंदिराचा जिर्णोद्धार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी गगनगिरी महाराजांचे शिष्य गणेशगिरी महाराज यांच्या हस्ते देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होणार असल्याचे आयोजक विनोद साबळे यांनी सांगितले.

करंजाडे येथे स्व. सदाशिव साबळे यांनी प.पू.गगनगिरी महाराज यांच्या आशिर्वादाने दुर्गा मातेचे मंदिर सन 2000 साली उभारले.या मंदिराला 25 वर्षे पूर्ण झाली. त्यामुळे हे मंदिर जीर्ण झाले होते.त्यामुळे साबळे परिवाराने या मंदिराचा जिर्णोद्धार करण्याचे ठरवले.यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. 8 ऑगस्ट 2025 रोजी गणेश पूजन , पुण्याह वाचन इत्यादी नामस्मरणाने या कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे.9 ऑगस्ट ला सकाळी 9 ते दुपारी 4 पर्यंत होम हवन होणार आहे सायंकाळी पाच ते सात देवीची दिंडी सोहळा मिरवणूक काढण्यात येणार आहे.या वेळी आरिवली येथील गावदेवी भजनी भारूड मंडळाचे दिंडी भजन होणार आहे तर रात्री 9 वाजता आदई येथीलदत्त प्रासादिक भजन मंडळाचे संगीत भजन आयोजित करण्यात आले आहे. तर रविवार 10 ऑगस्ट रोजी कलशारोहण व प्राणप्रतिष्ठा होणार आहे. या दिवशी सकाळी 7 ते 9 या वेळेत गगनगिरी महाराजांचे शिष्य गणेशगिरी महाराज यांच्या हस्ते देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व पूर्णाहुती 11:00 वाजता महाआरती होणार आहे.तर दुपारी 12 ते 3 वाजेपर्यंत तीर्थ प्रसाद व महाप्रसादाचे आयोजन आहे.यावेळी चिंचवली शेकीन येथील माऊली भजन मंडळ चिंचवलीचे भजन होणार आहे.करंजाडेतील ग्रामपंचायत कार्यालयासमोर हा सोहळा पार पडणार असून या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन विनोद साबळे यांनी केले आहे.